## गोंधळपाड्यातील महिलेचा खून

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथील एका ५० वर्षीय महिलेचा खून करण्यात आला आहे. ही घटना गुरुवारी (दि.२५) रात्री किहीम येथे घडली. मजुरीचे राहिलेले पैसे मागितल्याचा राग धरून तिच्या डोक्यावर कोणत्यातरी हत्याराने वार केला. त्यामध्येच तिचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. कमलीबाई किसन पवार (५०) रा. गोंधळपाडा असे या मृत महिलेचे नाव आहे. किहीम येथील मयेकर यांच्या घराचे बांधकाम चालू होते. त्याठिकाणी ही महिला काम करीत होती. पान ५ वर

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २७ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹

## सुनीता केजरीवाल मैदानात!

**नवी दिल्ली :** दिल्ली मद्य धोरण घोटाळा मनी लॉड्रिंग प्रकरणात आम आदमी पक्षांतील अनेक नेते वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालहे सध्या तिहार तुरुंगात आहेत. लोकसभा निवडणूक मतदान प्रक्रियेला देशभरात सुरूवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर केजरीवालांच्या पत्नी सुनिता केजरीवाल लोकसभा निवडणूक प्रचाराच्या रिंगणात उतरत आहेत, अशी अधिकृत माहिती आपच्या मंत्री आतिशी मारलेना यांनी दिली आहे. त्या आज (दि.२६) आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होत्या.

# देशात कमाल, राज्यात किमान


**। मुंबई । प्रतिनिधी ।**

देशामध्ये शुक्रवारी (दि. २६) लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले. राज्यातील आठ, तर संपूर्ण देशातील एकूण १३ राज्यांतील ८८ मतदारसंघांतील उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले. देशात सरासरी ६४.७० टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्याची आकडेवारी पाहता देशातील मतदानातील टक्केवारीत वाढ झाली असून राज्याच्या टक्केवारीत मात्र घट झाली असल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्रात आठ मतदारसंघात ५३.७१ टक्के मतदान झाले. यामध्ये वर्धा लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक ५६.६६ टक्के मतदानाची नोंद झाली. राज्यातील विदर्भात बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, तर मराठवाड्यात हिंगोली, नांदेड आणि परभणी अशा आठ मतदारसंघात मतदान पार पडले.



देशातील १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये एकूण ८८ मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले. यासाठी १६ कोटी मतदार पात्र होते. पण, त्यापैकी सुमारे ९ कोटी मतदारांनीच मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ९ मतदारसंघ हे अनुसूचित जातीसाठी तर ७ मतदारसंघ अनुसूचित जमातींसाठी राखीव होते.

यामध्ये केरळमधील सर्व २० मतदारसंघातील मतदान पूर्ण झाले. तर महाराष्ट्रातील ८ मतदारसंघातील मतदान पार पडले. त्याचबरोबर आसाम ५, बिहार ५, छत्तीगड ३, कर्नाटक १४, मध्य प्रदेशातील ७, महाराष्ट्रात ८, मणिपूर १, राज्यस्थानात १३, त्रिपुरा १, उत्तर प्रदेश ८, पश्चिम बंगाल ३, आणि जम्मू-काश्मीरमध्ये एका मतदारसंघात मतदान पार पडले.




दुसऱ्या टप्प्यात तराज्यातील प्रकाश आंबेडकर (अकोला), नवनीत राणा (अमरावती), रविकांत तुपकर (बुलडाणा), रामदास तडस (वर्धा) यांच्यासह देशभरातील ओम बिर्ला, राहुल गांधी, हेमा मालिनी, अरुण गोविल, ए.डी. कुमारस्वामी, शशी थरूर या उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये कैद झाले.

## ईव्हीएम कुऱ्हाडीने फोडले

नांदेड लोकसभा मतदारसंघात ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर एका तरुणानं ईव्हीएम मशीनची कुऱ्हाडीनं तोडफोड केल्याचा गंभीर प्रकार घडला. नांदेड जिल्ह्यातल्या बिलोली तालुक्यातील रामतीर्थ या गावात हा प्रकार घडला. भय्यासाहेब येडके असे ईव्हीएम फोडणाऱ्या तरुणाचे नाव असून, पोलिसांनी तात्काळ या तरुणाला ताब्यात घेतलं. पण त्यानं हे कृत्य का केलं हे मात्र अद्याप कळू शकलेलं नाही. पण या घटनेमुळं या तरुणामध्ये निवडणुकीबद्दल एकूणच राग असल्याचं दिसून आलं आहे.



# मुरुड तालुक्यात शेकापचा झंझावात

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

आगामी रायगड लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते व महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्यातील चुरस दिवसेंदिवस वाढत असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी गुरुवारी मुरुड तालुक्यातील विहुर, मजगाव, कोर्लई, मुरूड शहर आदी ठिकाणी येऊन शेतकरी कामगार पक्षासह महाविकास आघाडीच्या नेते व कार्यकर्त्यांचा गाठीभेटी घेतल्या. आ. पाटील यांनी मुरूड शहरातील अनंत गीते यांच्या कार्यालयात भेट देऊन महाविकास आघाडीतील कार्यकर्त्यांशी संवाददेखील साधला.

### आ. जयंत पाटील यांच्याकडून कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकूणच व्यूहरचनेबद्दल त्यांनी या कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली. महायुतीचे उमेदवार पान ५ वर




**आजचा अग्रलेख**
**नोटिसांचे नाटक**

## ‘नोटा’ला बहुमत मिळाल्यास फेरनिवडणूक घेण्याचा निर्णय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचे मतदान शुक्रवारी देशभरात पार पडले. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने निवडणुकीतील ‘नोटा’ या पर्यायावरील याचिकेवर महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत.

नोटापेक्षा कमी मते मिळणाऱ्या उमेदवारावर सर्व निवडणुकात पाच वर्षांसाठी बंदी घालावी, तसेच नोटाला बहुमत मिळाल्यास फेरनिवडणूक घ्यावी, यासंबंधित




**सर्वोच्च न्यायालयाकडून निवडणूक आयोगाला नोटीस**

नियम करण्याचे आयोगाला निर्देश देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहेत.

नोटापेक्षा कमी मते मिळविणाऱ्या उमेदवारांना पाच वर्षांच्या कालावधीसाठी सर्व निवडणुका लढवण्यापासून रोखले जाईल, काल्पनिक उमेदवार म्हणून नोटाचा योग्य आणि कार्यक्षम अहवाल प्रसिद्धी सुनिश्चित करण्यासाठी नियम तयार करावेत, नोटाला बहुमत मिळाल्यास, विशिष्ट मतदारसंघात झालेली निवडणूक रद्दबातल घोषित केली जाईल.

## तुढा सुटेना!

**नाशिक :** लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवाराच्या जागावाटपाचा तिढा अद्यापही कायम आहे. मंत्री छगन भुजबळ यांच्या संभाव्य उमेदवारीने हा तिढा वाढला होता. मात्र, त्यांना झालेल्या विरोधानंतर त्यांनी माघार घेतली. भुजबळांची माघार होताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटातील आणखी एक गट सक्रिय झाला आणि या गटाने माजी खासदार देविदास पिंगळे आणि विद्यमान आमदार माणिकराव कोकाटे यांना उमेदवारी देण्याची मागणी केली. शिवाय उमेदवारी मिळाल्यास निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली.




● रायगड लोकसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ शेतकरी भवन येथे इंडिया आघाडीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार संजय पोतनिस, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, नगरसेवक प्रदीप नाईक, ॲड. गौतम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. (छायाचित्र : समीर मालोदे) (सविस्तर वृत्त पान ३ वर)

**वेधक**

## अपघातात एक ठार, एक जखमी

**रायगड :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड तालुक्यातील वहूर येथे दुचाकीच्या झालेल्या अपघातात एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर चालक किरकोळ जखमी झाला आहे. सदरचा अपघात शुक्रवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घडला. दिगंबर माळजी नाकते-४०, रा. मुंबई असे मृत व्यक्तीचे नाव आहे. महेंद्र दामोदर नाकते-३० आणि दिगंबर माळजी नाकते, दोघे राहणार डोंबिवली हे दोघे दुचाकीवरुन चिपळूण ते मुंबई-डोंबिवली असा मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाने प्रवास करत होते. महाड तालुक्यातील वहूर पान ५ वर

# ग्रामीण भागातील महिलांना दिलासा

**‘जलजीवन’अंतर्गत ६१३ योजनांची कामे पूर्ण**

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून एक हजार ४९६ पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आल्या असून, या योजनांपैकी ६१३ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. तर, ४० योजनांची कामे अंतिम टप्प्यात आहेत. पाणीपुरवठा योजना पान ५ वर

> जलजीवन मिशन अंतर्गत ६१३ योजनांची कामे पूर्ण करण्यात आली असून, पुढील महिनाभरात ४९ योजनांची कामे पूर्ण होतील. प्रत्येक योजनेच्या कामाची माहिती वेळोवेळी घेण्यात येत आहे. योजनांची कामे त्वरित पूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात येत आहेत.
>
> – डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी

# पाण्यासाठी सरपंच आक्रमक



**पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना धरले धारेवर**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

उमटे धरणातून पुरवठा होणारे पाणी दूषित असून, पाण्यासाठी तीन दिवस वाट पाहण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. पाणीटंचाईवर ठोस उपाययोजना करण्यास जिल्हा परिषद ग्रामीण पुरवठा विभाग उदासीन ठरले आहे. त्यामुळे नागाव, चौल, आक्षी, रेवदंडा येथील ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य पाण्यासाठी एकवटले. नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी आक्रमक पावित्रा घेत संबंधित अधिकाऱ्याला धारेवर धरले. मुबलक पाणी कधी देणार, असा संतप्त सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

नागाव, चौल, आक्षी, रेवदंडा ही गावे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. उमटे धरणातून या गावांना पाणीपुरवठा पान ५ वर

# पेणमध्ये कावीळचे थैमान

- वाढत्या रुग्णांमुळे चिंतेचे वातावरण
- साथ रोखण्यात आरोग्य यंत्रणेला अपयश
- दूषित पाणी, अशुद्ध बर्फाचा हात

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहरासह तालुक्यामध्ये कावीळने थैमान घातले आहे. दिवसाकाठी साधारणतः ५० ते ७५ रूग्ण आढळत आहे. त्यामुळे आरोग्य विभागाचे धाबे दणाणले आहेत. दुसरीकडे सरकारी दवाखान्यामध्ये कावीळसाठी उपाययोजना अपुऱ्या पडत असल्याने साथ रोखण्यात आरोग्य यंत्रणेला अपयश आल्याचे चित्र आहे. त्यामुळे नाईलाजास्तव रुग्णांना खासगी दवाखान्यांमध्ये उपचार घ्यावे लागत असून, आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहेत.

गेल्याच आठवड्यात आरोग्य खात्याकडून तपासणी केल्यानंतर प्रदूषित पाण्यामुळे काविळचे रूग्ण वाढत असल्याचे समोर आले. त्याचबरोबर पेण शहरात बाजारहाट करणाऱ्या रूग्णांची संख्या लक्षणीय असल्याचे आढळले. पेण शहरात जो पाणीपुरवठा केला जातो, पान ५ वर

# निवडणुकीमुळे लाखोंची उलाढाल

- प्रचारसाहित्यांना मागणी वाढली
- हॉटेल, मंडप डेकोरेटर्सच्या हाताला काम

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा मतदारसंघात प्रचाराला आता चांगलीच रंगत आली आहे. प्रचारासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याला मागणी वाढली आहे. प्रचारसभा, रॅली, जेवणावळींमध्ये वाढ झाल्याने बाजारात लाखो रुपयांच्या उलाढालीने काही प्रमाणात उसळी घेतल्याचे चित्र आहे.

लोकसभा मतदारसंघ निवडणूक-२०२४ अंतर्गत सर्व उमेदवारांच्या निवडणुकीच्या प्रचार व इतर बाबींसाठी केलेल्या खर्चाची तपासणीची पहिली बैठक निवडणूक खर्च निरीक्षक धीरेंद्रमनी त्रिपाठी यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात बैठक पार पडली. या बैठकीला १३ उमेदवारांपैकी ११ उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

ज्या उमेदवारांनी निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र काढण्यात आलेल्या बँक खात्यातून खर्च न करता काही खर्च रोखीने केलेला आहे अशा उमेदवारांना प्रशासनाकडून नोटीस देण्यात आलेल्या आहेत. तसेच अनंत

> निवडणुकीसंदर्भातील प्रिंटींगची कामे सुरु आहेत. राजकीय पक्षांचे झेंडे, टोप्या, बिल्ले असे साहित्य त्या-त्या उमेदवारांना पक्षाकडून उपलब्ध होते. मंडप डेकोरेटर्स, हॉटेल व्यावसायिक, हार-फूल विक्रेते यांना काही प्रमाणात काम उपलब्ध होत आहेत. आचारसंहिता सुरु असल्याने शुभेच्छा बॅनर छापायचे की नाही, अशी भीती काही ग्राहकांमध्ये आहे.
>
> – सुधीर आग्रावकर, उद्योजक

पद्मा गीते व अनंत बाळोजी गीते हे अपक्ष उमेदवार सदर बैठकीसाठी अनुपस्थित होते. त्या उमेदवारांना नोटीस बजावण्यात आलेली आहे.

उमेदवारांनी २२ एप्रिलअखेर निवडणूक प्रचारासाठी केलेल्या खर्चाचा तपशील प्रशासनाला सादर केला आहे. त्यामध्ये काही प्रमाणात तफावत होती. प्रशासनाने पान ५ वर






# निवडणुकीत शेतकरी नेत्यांचा स्वबळावर संघर्ष

। मुंबई । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी गावागावापर्यंत पक्षाची यंत्रणा लागते, कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करावे लागते. पाच-सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये संपर्क असावा लागतो. आता तर पक्षाच्या यंत्रणेच्या पलीकडे मित्रपक्षांचे सहकार्यसुद्धा आवश्यक असते. अशा परिस्थितीमध्ये दोन शिलेदारांनी महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे, त्यापैकी एक आहेत राजू शेट्टी आणि दुसरे रविकांत तुपकर. दोघेही शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणारे आणि महायुती किंवा महाविकास आघाडीपासून ते वेगळे राहून स्वतंत्रपणे लढत आहेत.



बुलढाणा मतदारसंघातून रविकांत तुपकर हे अपक्ष लढत आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेत राजू शेट्टी यांच्यासोबत त्यांच्यातील कार्यकर्त्यांची जडणघडण झाली आणि प्रभावी वक्तृत्व आणि मुद्देसूद आक्रमक मांडणीमुळे ते राज्यभर लोकप्रियही झाले. शेतकरी संघटनेच्या परंपरेप्रमाणे शेट्टी आणि तुपकर यांच्यात मतभेद होऊन तुपकर राजू शेट्टी यांच्यापासून वेगळे झाले. बुलढाणा मतदारसंघात शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे विद्यमान खासदार प्रतापराव जाधव आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते नरेंद्र खेडेकर समोरासमोर आहेत.

दोघांनाही महायुती आणि महाविकास आघाडीतील तीन तीन पक्ष तसेच त्यांच्या राज्य, राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांच्या प्रचारसभांची मदत झाली. याउलट तुपकर कोणत्याही पक्ष आणि नेत्यांच्या मदतीशिवाय एकटे लढले आणि मतदारसंघात उत्तम वातावरण निर्मिती केली.

केवळ शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी केलेले लढे एवढ्याच भांडवलावर सामान्य शेतकरी कुटुंबातील हा तरूण मैदानात उतरला आहे. २०२१ मध्ये त्यांनी सोयाबीन-कापूस दरवाढीसाठी केलेले अन्नत्याग आंदोलन राज्यभर गाजले. त्यांच्या नावावर अनेक आंदोलने आहेत. मतदार त्यांना कसा प्रतिसाद देतात, हे पाहावे लागणार आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले मतदारसंघातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी हे दोन वेळा खासदार झाले आहेत. शेट्टी यांना २०१९ च्या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला. २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षासोबत राहून त्यांनी निवडणूक लढवली. परंतु भाजपच्या शेतकरीविरोधी धोरणाचा निषेध करून एनडीएमधून बाहेर पडणारे ते पहिले खासदार होते.

भाजपसोबत गेल्याबद्दल त्यांनी आत्मक्लेश आंदोलनही केले. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत ते महाविकास आघाडीसोबत होते. परंतु शेतकरी प्रश्नांसंदर्भात आघाडीकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी आघाडीची साथ सोडली.

## जानकरांची यंदा परभणीतून ‘शिट्टी’

**राजकारणात स्वतंत्र लढणाऱ्यांत बच्चू कडू, रवी राणा, महादेव जानकर यांचाही उल्लेख करावा लागतो. पैकी महादेव जानकर महायुतीच्या पाठिंब्यावर परभणीतून उभे आहेत. त्यांचे राजकारण राष्ट्रीय समाज पक्षांच्या माध्यमातून स्वतंत्रपणे होत असते. त्यांनी राजकारणाची सुरुवात कांशिराम यांच्या बहुजन समाज पक्षातून केली. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रात यशवंत सेनेच्या माध्यमातून धनगर समाजाचे राजकारण केले. त्यानंतर त्यांनी स्वतंत्र पक्षाची स्थापना केली.**

# अहमदनगरमधून दोन निलेश लंके रिंगणात

। अहमदनगर । वृत्तसंस्था ।

अहमदनगर लोकसभा मतदारसंघात भाजपने पुन्हा एकदा सुजय विखे पाटील यांना उमेदवारी दिली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातून निलेश लंके निवडणुकीच्या रिंगणात आहे. आता अहमदनगर लोकसभेची निवडणूक दोन निलेश लंके लढवणार आहेत.



अहमदनगरमध्ये उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी निलेश साहेबराव लंके यांनी अपक्ष अर्ज भरला आहे. त्यामुळे निलेश लंकेंना मतदान करणाऱ्या मतदारांची चांगलीच धांदल उडणार असल्याचे चित्र आहे.

यावरुन महाविकास आघाडीने पत्रकार परिषद घेत भाजपचे उमेदवार सुजय विखेंवर निशाणा साधला आहे. डमी राजकारण करण्याची विखेंची परंपरा आहे, अशी टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी केली आहे. दरम्यान, अहमदनगर लोकसभा मतदारसंघासाठी शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांची धावपळ उडाल्याचे दिसून आले.

नगरमधून शेवटच्या दिवशी २७ उमेदवारांनी ३२ नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या उमेदवारांची संख्या ४३ वर पोहचली आहे.

## वे|ध|क

### अभिजीत पाटील यांचे गोडाऊन सिल

**माढा :** लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारार्थ करमाळा इथे शनिवारी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, ही सभा सुरू असतानाच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अभिजीत पाटील यांना धक्का बसला. कारण पाटील यांच्या श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणूनगर-गुरसाळे या कारखान्याचे ३ गोडाऊन महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सिल केले.भरसभेत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी ही माहिती अभिजीत पाटील यांना देताच ते ताडकन् उठले आणि पंढरपूरच्या दिशेने रवाना झाले.

### शांतिगिरी महाराज निवडणूक लढवणार

**नाशिक :** नाशिक आणि दिंडोरी मतदारसंघातून पहिल्याच दिवशी अर्ज दाखल करण्यास प्रारंभ झाला आहे. यामध्ये दिंडोरीतून आघाडीतील घटक पक्ष असलेल्या माकपचे जिवा पांडू गावित यांनी अर्ज दाखल केला आहे, तर नाशिक मतदारसंघातून शांतिगिरी महाराज यांनीही अर्ज दाखल केला आहे. शुक्रवार दिनांक २६ एप्रिलपासून लोकसभेच्या पाचव्या टप्प्यासाठी मतदान प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज विक्रीच्या पहिल्याच दिवशी नाशिकमधून ८७ तर दिंडोरीमधून ४० अर्जांची विक्री झाली आहे. नाशिकमधून शांतिगिरी महाराज यांच्यासह महायुतीचे इच्छुक उमेदवार खासदार हेमंत गोडसे तसेच समता परिषदेच्या दिलीप खैरे यांच्यासाठी अर्ज देण्यात आले आहेत. नाशिकमध्ये प्रमुख राजकीय पक्षांची उमेदवारी अद्याप फायनल नसतानाच महायुतीसाठी इच्छुक असलेल्या घटकांकडून अर्ज देण्यात येत असल्याने राजकारणात चर्चेचा विषय ठरला आहे. याशिवाय शांतिगिरी महाराजांनी नाशिक लोकसभेची निवडणूक लढण्यावर ठाम असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# अपक्ष संजय वाघेरेंचा अर्ज बाद

। पिंपरी । वृत्तसंस्था ।

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांच्याशी नामसाधर्म्य असलेले अपक्ष उमेदवार संजय सुभाष वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज बाद झाला आहे. तर, उरणमधील संजोग रवींद्र पाटील यांचा अर्ज वैध ठरला आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी १८ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नव्हता. दुसऱ्या दिवशी एकाने तर पाचव्या दिवशी तीन अर्ज दाखल झाले. त्यात शिवसेना महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांचा समावेश होता. २३ एप्रिल रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांच्यासह सहा तर २४ एप्रिल रोजी वंचित बहुजन आघाडीच्या माधवी जोशी यांच्यासह आठ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. तर, २५ एप्रिल, शेवटच्या दिवशी २० जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

एकूण ३८ अर्ज दाखल झाले आहेत. या अर्जांची शुक्रवारी (२६ एप्रिल) छाननी केली. काँग्रेसचा ए, बी फॉर्म नसल्याने गोपाळ तंतरपाळे यांचा तर राष्ट्रीय वाल्मिकी सेना पार्टीचे राजेंद्र मानसिंह छाजछिडक यांचाही अर्ज बाद झाला आहे. तिघांचे अर्ज बाद झाले असून ३५ जणांचे वैध ठरले आहेत.

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील बंधारपाडा येथील संजय सुभाष वाघेरे आणि उरणमधील संजोग रवींद्र पाटील यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांचे नामसाधर्म्य असलेल्या दोन उमेदवारांचे अर्ज बाद झाले.

त्यापैकी संजोग पाटील यांचा उमेदवारी अर्ज भरताना खासदार बारणे यांचे समर्थक माऊली घोगरे सोबत होते. त्यांच्या खिशावर धनुष्यबाणाच्या चिन्हासह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि श्रीरंग बारणे यांचेही छायाचित्र होते. बारणे यांनीच मतविभागणीसाठी ही खेळी खेळल्याचे दिसून आले. बारणे यांच्यासाठी ही लढत सोपी नसून संजोग यांना मतदारांचा चांगला पाठिंबा मिळत असल्याचे दिसते.

## ‘ऑपरेशन ऑल आऊट’ यशस्वी

**पनवेल :** लोकसभा निवडणुका शांततेत पार पाडाव्यात, यासाठी पनवेल परिमंडळ २ मधील पोलिसांनी तयारी सुरू केली आहे. मागील काही दिवसांत राबविण्यात आलेल्या ऑपरेशन ऑल आऊटअंतर्गत १० पोलिस ठाण्यांमार्फत विविध कारवाया करण्यात आल्या आहेत.

मोहिमेत एक हजार ४४८ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली. यापैकी तब्बल ३४८ वाहनांवर कारवाया करण्यात आल्या. आठ जणांवर बेकायदा हत्यार बाळगल्याने कारवाई करण्यात आली.

# सांगलीत काँग्रेस आघाडी धर्म पाळेल

। सांगली । वृत्तसंस्था ।

देशाची परिस्थिती भयावह आहे. भाजपला पराभूत करायचे आहे. त्यासाठी सांगलीतील काँग्रेसचे कार्यकर्ते आघाडी धर्माचे पालन करतील. शिवसेना उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या प्रचारात उतरतील, अशी घोषणा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज पत्रकार परिषदेत केली.



माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विधिमंडळ गटनेते बाळासाहेब थोरात, आमदार विश्वजित कदम, आमदार विक्रम सावंत, शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील उपस्थित होते. पत्रकार परिषद संपल्यानंतर शिवसेनेचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनी काँग्रेस नेत्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

### नाना पटोलेंचे प्रतिपादन

बंडखोरी केल्याबद्दल विशाल पाटील यांच्यावर कारवाई करणार का, या प्रश्नावर नाना पटोले म्हणाले, जिल्ह्यातील परिस्थितीचा एक अहवाल मी दिल्लीला पाठवणार आहे. तेथील शिस्तपालन समिती त्यावर निर्णय घेईल. पुढील कारवाई केली जाईल. भाजपने सत्तेचा दुरूपयोग केला. देश विकला, कर्जबाजारी केला. हे पाप भाजपचे आहे. केंद्रातील सत्ताधाऱ्यांचे आहे. आमच्या नेत्या सोनिया, राहुल गांधी यांना त्रास दिला. तो त्रास आमचा काँग्रेसचा कार्यकर्ता विसरणार नाही. पुन्हा या देशात भाजप सरकार येता कामा नये, अशी आमची भूमिका आहे.

### काँग्रेस पक्ष हतबल नाही

**सांगलीची जागा ज्या पद्धतीने शिवसेनेने रेटली, ती पाहता काँग्रेस हतबल होती का, यावर पटोले म्हणाले, काँग्रेस हतबल नाही. आम्ही राष्ट्रीय पक्ष आहोत. देशाचे स्वातंत्र्य आणि देशाच्या संविधाननिर्मितीत काँग्रेसचे योगदान आहे. ते वाचवणे काँग्रेसचीच जबाबदारी आहे. आम्हाला लोभापेक्षा देश महत्त्वाचा आहे.**

# महाविकास आघाडीचे उमेदवार सोमवारी अर्ज दाखल करणार

। नाशिक । वृत्तसंस्था ।

दिंडोरी तसेच नाशिक लोकसभा मतदारसंघात जागावाटपावरून महायुतीच्या उमेदवारांचा घोळ सुरू असताना दुसरीकडे महाविकास आघाडीने एक पाऊल पुढे टाकत येत्या सोमवारी (ता. २९) दोन्ही उमेदवारांचे अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.

यानिमित्ताने महाविकास आघाडीकडून शहरात जोरदार शक्तिप्रदर्शन केले जाणार आहे. नाशिकमधून शिवसेनेचे (ठाकरे गट) राजाभाऊ वाजे, तर दिंडोरीतून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) भास्कर भगरे उमेदवारी अर्ज दाखल करतील. अर्ज दाखल करताना शालिमार येथील शिवसेना कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालयादरम्यान, महारॅली निघणार आहे. जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर, सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, महानगरप्रमुख विलास शिंदे, माजी आमदार वसंत गिते, माजी महापौर विनायक पांडे, डी. जी. सूर्यवंशी, उपजिल्हाप्रमुख प्रमुख जगन आगळे, देवानंद बिरारी, महेश बडवे, युवा सेना जिल्हाधिकारी राहुल ताजनपुरे, विधानसभाप्रमुख बाळासाहेब कोकणे, संजय चव्हाण यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आधी मतदान, मगच लगीन

## नवरदेव थेट मतदान केंद्रावर, आधी बजावला मतदानाचा हक्क

। हिंगोली । वृत्तसंस्था ।

सेनगाव तालुक्यातील उटी (ब्रम्हचारी) येथे नवरदेवाने बोहल्यावर चढण्याअगोदर मतदान करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले.



लोकसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी लग्नाचा मुहूर्त असल्यामुळे याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर होणार नाही, याची काळजी प्रत्येक मतदाराने घेऊन आपल्या मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन निवडणूक विभागाने केले होते. देतसेनगावातील गोपाल पोहकर यांचा विवाह हिंगोली तालुक्यातील आमला येथील मुलीशी २६ एप्रिल रोजी ठरला. विवाह आणि मतदानाचा मुहूर्त एकाच दिवशी आल्याने नवरदेव गोपाल पोहकर यांनी लग्नाकरीता आमला येथे निघण्याअगोदर उटी येथील मतदान केंद्रावर जाऊन आपल्या मतदानाचा हक्क बजावला. नवरदेव मतदानासाठी आल्याचे पाहून मतदान केंद्रांवरील अधिकाऱ्यांसह ग्रामस्थांनी स्वागत केले.

# ‘दिल्लीत जाणार, पण खाली-फुकट नाही’

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बैतुलच्या सभेत मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना दिल्लीला घेऊन जात असल्याचे वक्तव्य केले होते. ते आता तिथे काम करतील असेही म्हणाले होते. यावर शिवराजसिंह चौहान यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



नुकत्याच झालेल्या विधानसभेला विजय मिळाल्यानंतर मुख्यमंत्री न केल्याने शिवराज नाराज होते. मुली, महिलांसाठीच्या योजनांमुळे ते कमालीचे लोकप्रिय होते. अशातच भाजपाला विधानसभेला घवघवीत यश मिळाले होते. यामुळे पुन्हा शिवराजच मुख्यमंत्री होणार हे निश्चित असताना भाजपने धक्कादायक निर्णय घेत मोहन यादव यांना संधी दिली. आता शिवराज हे विदिशा लोकसभा मतदारसंघातूननिवडणूक लढवत आहेत. मी दिल्लीला जाईन त्यांची चिंता करू नका, असे वक्तव्य शिवराज यांनी केले आहे.

# सांगलीत भाजप उमेदवाराला धक्का

। सांगली । वृत्तसंस्था ।

महाविकास आघाडीतील संघर्षामुळे सांगली लोकसभा मतदारसंघाची राज्यभर मोठी चर्चा झाली. महाविकास आघाडीच्या जागावाटपात ही जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे गेल्यानंतर अखेर विशाल पाटील यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला.

महाविकास आघाडीची ताकद विभागली गेल्याने याचा भाजप उमेदवार संजय पाटील यांना फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र आता विशाल पाटील यांनी भाजपला धक्का दिला असून मिरजमधील भाजप नगरसेवकांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देत विशाल पाटलांचा प्रचार सुरू केला आहे.

मिरजमधील भाजपच्या काही नगरसेवकांनी यापूर्वीच संजयकाका पाटील यांच्यावर नाराजी व्यक्त करत विशाल पाटलांना साथ देण्याची भूमिका घेतली होती. त्यानंतर भाजपच्या शहर जिल्हाध्यक्षांकडून बंडखोर चार नगरसेवकांच्यावर कारवाईचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदेश भाजप कार्यालयाकडे पाठवण्यात आला होता. परंतु पक्षाकडून अशी कारवाई होण्याच्या आधीच भाजपचे बंडखोर नगरसेवक संदीप आवटे, निरंजन आवटी, आनंदा देव माने आणि शिवाजी दुर्वे यांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे विशाल पाटलांची ताकद वाढण्यास मदत होणार आहे. दरम्यान, आणखी तीन नगरसेवकही गुप्तपणे विशाल पाटील यांनाच मदत करणार असल्याचा दावाही या बंडखोर नगरसेवकांकडून करण्यात आला आहे. नगरसेवकांसह काही भाजप नेते उमेदवारासोबतचा जुना हिशेब चुकता करण्यासाठी छुप्या राजकीय खेळ्या करू पाहात आहेत. हाच प्रकार शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेसच्या गोटातही दिसून येत आहे.

## संजय पाटलांना समाजवादीचा पाठिंबा

। मुंबई । वृत्तसंस्था ।

महाविकास आघाडीचे उत्तर-पूर्व मतदारसंघातील उमेदवार संजय पाटील यांना समाजवादी पक्षाने पाठिंबा जाहीर केला आहे. याबाबतचे पत्रक गुरुवारी काढले. समाजवादी पक्ष इंडिया आघाडीसोबत असून सांप्रदायिक शक्तीला व हुकूमशाहीला बाजूला सारून देशात संविधान वाचवणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाजवादी पक्ष मुंबई प्रदेशातील इंडिया आघाडीच्या सर्व उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील आहे.

# पहिल्यांदाच पंजाला मतदान-उद्धव ठाकरे

। मुंबई । वृत्तसंस्था ।

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने वर्षा गायकवाड यांना उत्तर मध्य मुंबईतून उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर वर्षा गायकवाड यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली.



या वेळेस ईशान्य मुंबईचे ठाकरे गटाचे उमेदवार संजय दिना पाटील यांच्यासह कल्याण डोंबिवलीच्या उमेदवार वैशाली दरेकर उपस्थित होत्या. ठाकरे गटाच्या या दोन्ही उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आले. यावेळी माझे मत वर्षा गायकवाड यांना आहे. त्यांना खासदार करून दिल्लीत पाठवणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. पत्रकारांशी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, हा मतदारसंघ माझ्यासाठी नवा नाही. मुंबईतील सहाच्या सहा जागा महाविकास आघाडीच्या निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. यंदा सन २००४ ची पुनरावृत्ती होईल, असा विश्वास वर्षा गायकवाड यांनी व्यक्त करत असतानाच उद्धव ठाकरे यांनी थांबवले आणि वर्षाताई एक मिनिट माझे मत तुला मिळणार आहे. कारण मी तिचा मतदार आहे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. पंजाला पहिल्यांदा मतदान, पण हातामध्ये मशाल देशात हुकूमशाही येऊ नये, राज्यघटना बदलू नये, यासाठी महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि देशात इंडिया आघाडी लढतेय आणि जिंकणार आहे.

वर्षा गायकवाड कुठूनही लढू शकतात आणि जिंकू शकतात. महायुतीबरोबर आम्ही आघाडी केलेली नाही, त्यामुळे त्यांच्या उमेदवाराचे काही सांगू शकत नाही, असा टोला लगावला.

# ‘हुकूमशाही सरकारला घरी बसवा’

। खोपोली । प्रतिनिधी ।

देशात लोकशाही टिकवायची असेल, तर हुकूमशाही सरकारला घरी बसवले पाहिजे. महाराष्ट्राचे हित साधण्याचे, समाजातील सर्व घटकांना खऱ्या अर्थाने न्याय देण्याचे काम फक्त महाविकास आघाडीच करू शकते. त्यामुळे मावळ लोकसभा मतदार संघात इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना लोकसभेत पाठवू, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे राष्ट्रीय अल्पसंख्याक अध्यक्ष सिराज मेहंदी यांनी व्यक्त केले.

इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना पांठिबा देण्यासाठी रिशीवन रिसार्टच्या सभागृहात मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस व प्रवक्ते नासिम सिद्दिकी, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे मोहम्मद नजीर, सुलतान मालदार, रियाज पठाण, असलम खान, राशिद भाई, यांच्यासह मुस्लिम अल्पसंख्यांक समाजातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माढ्यात महायुतीला धक्के सुरूच

## करमाळ्याचे माजी आ. नारायण पाटील यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

। माढा । वृत्तसंस्था ।

माढा लोकसभा मतदारसंघात गेल्या काही दिवसांपासून नाट्यमय राजकीय घडामोडी घडत आहेत. मोहिते पाटील कुटुंबाने भाजपविरोधात बंड करत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर पवार यांनी माढ्यातून धैर्यशील मोहिते पाटील यांना उमेदवारी जाहीर केली.

मोहिते पाटलांचा विजय सुकर व्हावा यासाठी पवारांकडून नवनवे डावपेच आखले जात आहेत. लोकसभेसाठी इच्छुक असलेल्या अभयसिंह जगताप यांचं बंड थंड केल्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे



करमाळ्यातील माजी आमदार नारायण पाटील यांना आपल्याकडे खेचण्यात शरद पवारांना यश मिळाले आहे. नारायण पाटील यांनी शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे.

करमाळ्याचे विद्यमान आमदार संजय शिंदे हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीसोबत आहेत. त्यामुळे नारायण पाटील यांनी शरद पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याचे दिसत आहे. धैर्यशील मोहिते पाटलांच्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातील प्रवेश सोहळ्यावेळीही नारायण पाटील उपस्थित होते.

त्यामुळे तेही पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करतील, असे सांगितले जात होते. अखेर या चर्चेवर आज शिक्कामोर्तब झाले असून पाटील यांनी हाती तुतारी घेतली आहे. मतदारसंघात एकूण ३८ उमेदवार होते. यापैकी सहा जणांनी निवडणुकीतून माघार घेतली.

आता ३२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या ठिकाणी भाजपचे रणजितसिंह नाईक निंबाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाचे धैर्यशील मोहिते पाटील तसेच वंचितचे रमेश बारसकर यांच्या थेट लढत होणार आहे. यांच्यासोबत आणखी २९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

माढ्यातील उमेदवारांमध्ये सातारा जिल्ह्यातील १० जणांचा समावेश आहे. राजकीय पक्षाकडून चौघे जण, तर अपक्ष म्हणून सहा जण रिंगणात आहेत. उर्वरित २२ उमेदवार सोलापूर जिल्ह्यातील आहेत. माढा लोकसभा मतदारसंघात सोलापूर जिल्ह्यातील माढा, माळशिरस, करमाळा आणि सांगोला तर सातारा जिल्ह्यातील माण आणि फलटण असे सहा विधानसभा मतदारसंघ येतात. त्यामुळे माढ्याच्या निवडणूक मैदानात सातारा तसेच सोलापूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारी अर्ज दाखल करतात. आताही या निवडणुकीत दोन्ही जिल्ह्यांतील उमेदवार आहेत. या निवडणुकीचे राजकीय चित्र सोमवारी स्पष्ट झाले. त्यानुसार यावर्षी रणांगणात ३२ जण राहिले आहेत. सातारा जिल्ह्यातील १० जण माढा लोकसभा निवडणुकीच्या मैदानात आहेत.

यामध्ये भाजपकडून विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचा समावेश आहे. त्याचबरोबर बसपाकडून स्वरूपकुमार जानकर, स्वराज्य सेना (महाराष्ट्र) कडून सत्यवान ओंबासे तर रिपाइं (ए) च्या वतीने संतोष बिचुकले निवडणूक लढवत आहेत.

# अनंत गीतेंना बहुमतांनी निवडून द्या

## आ. संजय पोतनीस यांचे आवाहन

**। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते सहा वेळा खासदार झाले. त्यात केंद्रीय मंत्री म्हणून देखील काम केले आहे. मात्र, त्यांनी कधीही पदाचा दुरुपयोग केला नाही. प्रामाणिक नेता म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे. या निवडणुकीत त्यांना बहुमतांनी निवडून द्या, असे आवाहन आ. संजय पोतनीस यांनी केले.

महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ शेतकरी भवन येथे इंडिया आघाडीच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक गुरुवारी (दि.२५) आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, प्रदिप नाईक, ॲड. गौतम पाटील, पिंट्या ठाकूर, कविता ठाकूर, समीर ठाकूर, कमलेश खरवले, संदीप पालकर, अजय झुंजारराव आदी इंडिया आघाडीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपसोबत असताना शिवसेनाला नेहमी दुय्यम दर्जेची वागणूक देण्याचे काम भाजपने केले आहे. त्यांनी शिवसेनेला संपविण्याचा घाट घातला. शिवसेना फोडण्याचे काम केले. हुकूमशाही निर्माण करण्याची भाजपची भुमिका आहे. देशातील विरोधक संपवून एकहाती सत्ता निर्माण करून नागरिकांना गुलाम करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. भाजप संविधान विरोधी भूमिकेतून काम





करीत आहेत. आता देशातील लोकशाही वाचविण्याची गरज निर्माण झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले संविधान काढून त्याठिकाणी स्वतःच्या मर्जीने सत्ता निर्माण करण्याच्या हालचाली सुरु आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून तुम्हा आम्हा सर्वांना समानतेचा मार्ग दिला. अन्यायाविरोधात लढण्याची व बोलण्याची ताकद दिली. ते संविधान वाचविण्यासाठी या निवडणुकीत अनंत गीते यांना बहुमतांनी निवडून द्या, असे आवाहन पोतनीस यांनी केले.

तसेच माजी उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे म्हणाल्या की, २००९ ते २०१९ ची निवडणूक आपण सर्वांनी पाहिली. परंतु, २०१९ ते २०२४ या पाच वर्षांमध्ये कमालीचा बदल राज्यपातळीवर तसेच देशपातळीवर झाला आहे. २०२४ची निवडणूक ही अतिशय महत्वाची निवडणूक आहे. जर आपण महाविकास आघाडीच्या उमेदवाराला ठामपणे मत दिले नाही तर कदाचित ही निवडणूक शेवटची निवडणूक ठरू शकेल. कदाचित २०२९ पासून निवडणुका होणारही नाहीत, अशी परिस्थिती आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून अनंत गिते यांना निवडून आणण्यासाठी आपण धगधगती मशाल पेटवली आहे. तसेच, निष्कलंक व्यक्तिमत्व म्हणून अनंत गीते यांना निवडून द्यायचे आहे. शेकापक्ष तसेच महाविकास आघाडीतील सर्वपक्षीयांनी निर्धार केलेला आहे की, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे अनंत गीते यांना बहुमताने विजयी करायचे आहे.

## वे|ध|क

## ‘इंडिया’चा प्रचार जोमात

### शेलू पंचायत समिती गणामध्ये घरोघरी कार्यकर्ते पत्रके देण्यात गुंतले



**नेरळ :** कर्जत तालुक्यातील महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना मताधिक्य मिळवून देण्यासाठी चार पक्षांचे कार्यकर्ते यांनी जिल्हा परिषद प्रभागाप्रमाणे प्रचाराला सुरुवात केली. प्रत्येक ग्रामपंचायतीमधील प्रत्येक घरात जाऊन महाविकास आघाडीमधील घटक पक्षाचे कार्यकर्ते यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. शेलू पंचायत समिती गणामध्ये महाविकास आघाडीमधील घटक पक्ष शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट तसेच शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शेलू, दामत आणि ममदापुर गावामध्ये प्रत्येक मतदाराच्या घरात पोहचून उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांची पत्रके देऊन मतदान करण्याचे आवाहन केले.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचाराची सुरुवात गुरुवारपासून (दि.२५) झाली. शेलू पंचायत समिती गणापासून महाविकास आघाडीमधील सर्व घटक पक्ष यांचे पदाधिकारी यांनी शेलू येथील शिव मंदिरात प्रचार सुरु केला.त्यावेळी महाविकास आघाडीमधील सर्व चार पक्षांचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. महाविकास आघाडी मधील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षांचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ झाला. त्यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश टोकरे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती नारायण डामसे, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका अध्यक्ष श्रीराम राणे आदी प्रमुखांच्या हस्ते प्रचाराचा श्रीफळ वाढविण्यात आला.

## दिव्यांग, ज्येष्ठांसाठी ‘सक्षम’

**रायगड :** लोकसभा निवडणुकीत दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना सुलभ पद्धतीने मतदान करता यावे, यासाठी ‘सक्षम’ ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. या ॲपच्या माध्यमातून त्यांना मतदान नोंदणीच्या तपशीलापासून ते त्यांच्या मतदान केंद्राची माहिती मिळवण्यासाठी या ॲपची मदत होणार आहे.

तसेच मतदानाच्या वेळी केंद्रावर पोहोचण्यासाठी व्हीलचेअरची मागणीही त्यांना या ॲपच्या माध्यमातून करता येणार आहे.अनेकदा दिव्यांग व्यक्ती किंवा ज्येष्ठ नागरिकांना आजारपणामुळे मतदानासाठी घराबाहेर पडणे टाळतात. त्यामुळे मतदानाच्या संख्येत घट होताना दिसून येते. ही बाब लक्षात घेऊन सरकारने दिव्यांग आणि ज्येष्ठांचा मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी त्यांना ‘सक्षम’ केले आहे. या ॲपमुळे ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना घरबसल्या त्यांच्या मतदान केंद्राची माहिती मिळवता येणार आहे. तसेच त्या ॲपवर नोंदणी केल्यानंतर त्यांना केंद्रावर मतदान करण्यासाठी प्राधान्य दिले जाणार आहे.

दरम्यान, रायगड जिल्ह्यात १२ हजार ३६३ दिव्यांग नागरिक तर, ३७ हजार ६९४ हे ८५ पेक्षा जास्त वय असणारे मतदार आहेत. त्यांना मतदान नोंदणी किंवा मतदान केंद्र कुठे असेल, हे तपासणेही कठीण होते. त्यांचे हे मत वाया जाऊ नये, यासाठी या ॲपच्या माध्यमातून त्यांना त्यांचे मतदान केंद्र तपासता येणार आहे.

### ॲपचा वापर कसा करावा?

**गुगल प्ले स्टोरवरून ‘सक्षम’ हे ॲप डाऊनलोड करावे. या ॲपवर दिव्यांग मतदारांना नवीन मतदार नोंदणी, अपंग व्यक्ती म्हणून चिन्हांकित करणे, मतदानाचे स्थान बदलण्याची विनंती, दुरुस्त्या करणे, स्थिती ट्रॅक करणे अशी विविध कामे करता येणार आहेत. तसेच ज्या मतदारांना मतदान केंद्रावर येऊन मतदान करायचे आहे, त्यांच्यासाठी निवडणुकीच्या दिवशी या ॲपच्या माध्यमातून व्हीलचेअरही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**

# महिला मतदारांचा कल ठरणार निर्णायक

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकांच्या निमित्ताने देशभरात प्रचाराची धामधूम सुरू आहे. लोकशाहीच्या या उत्सवात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. वाढती महागाई, महिला सुरक्षा, कौटुंबिक हिंसाचार, बेरोजगारी हे महिलांचे प्रश्न कायम आहे. महिला आरक्षणाचे विधेयक पारित झाले, मात्र महिला खऱ्या अर्थाने सक्षम कशा होणार, हा प्रश्न कायम आहे. त्यामुळे यंदा महिलांचा कौल कोणाला असणार, यावर उमेदवाराच्या विजयाचे गणित अवलंबून आहे. रायगड लोकसभा मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत महिलांचे मतदान निर्णायक असणार आहे.

रायगड लोकसभा मतदारसंघात एकूण आठ लाख ४७ हजार ७६३ महिला मतदारांची संख्या आहे. यामध्ये पेण विधानसभा एक लाख ५० हजार ३९८, अलिबाग विधानसभा एक लाख ५० हजार १६३, श्रीवर्धन विधानसभा एक लाख ३३ हजार १०, महाड विधानसभा एक लाख ४२ हजार ४२१, दापोली विधानसभा एक लाख ४५ हजार ४९४ आणि गुहागर विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे.

नोकरदार महिलांपासून, मनोरंजनापासून ते व्यवसायातही महिला पुढे आहेत. तर कुटुंबाला हातभार लावण्यासाठी छोटी- मोठी काम करणाऱ्या महिलांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महिला मतदारांचा कल महत्त्वाचा आहे. हे लक्षात घेऊन भाजप, काँग्रेससह सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या जाहीरनाम्यात महिलांचे प्रश्न प्रामुख्याने घेतले आहे.

अलीकडे उमेदवाराच्या विजय, पराभवात महिलांचे मत निर्णायक ठरत आहेत. त्यामुळेच सर्व राजकीय पक्षांना महिलांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी विचारात घ्याव्या लागतात. मात्र, महिलांची एवढी संख्या असूनही मतांसाठी त्यांचा वापर केला जातो, असा सूरही महिलांमधून उमटत आहे. महिला विकासासंदर्भातील दिलेली आश्वासने निवडणुकीनंतर त्याची पूर्तता होताना दिसत नाही. त्यामुळे महिलांबद्दल कितीही घोषणा झाल्या तरी महिलांचे मूळ प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत. अशा भावना महिलांनी व्यक्त केल्या आहेत.

रायगड लोकसभा मतदारसंघात एकूण १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार आहेत. यात पुरुष मतदारांची संख्या ८ लाख १३ हजार ५१५ आहे, तर स्त्री मतदारांची संख्या ८ लाख ४० हजार ४१६ आहे. शिवाय ४ तृतीयपंथी मतदार आहेत. पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या २६ हजार ९०१ ने अधिक आहे.



### महिलांचे मुख्य प्रश्न

- वाढती महागाई
- सार्वजनिक ठिकाणी असुरक्षितता
- आरोग्य आणि रोजगाराचा प्रश्न
- सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांचा अभाव
- सुरक्षित प्रवास कौटुंबिक हिंसाचार
- कार्यालयीन ठिकाणी लैंगिक भेदभाव,असमानता

### राजकीय पक्षांकडून अपेक्षा

- महिलांना सन्मान आणि संरक्षणाची हमी
- नोकऱ्यांमध्ये आरक्षण हवे
- महिलांसाठी आरोग्य सुविधा
- कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांना कायदेशीर संरक्षण
- गॅस सिलिंडरचे दर कमी करा
- लोकलमध्ये महिला डब्यांची संख्या वाढवणे

त्यामुळे दिल्लीतील लोकसभेत रायगडचा खासदार कोण पाठवायचा, हे महिला ठरवणार आहेत.

# बोलीभाषेतून मतदान जनजागृती



आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी विभागाचा उपक्रम

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्ह्यात वेगवेगळ्या यंत्रणेमार्फत काम सुरु करण्यात आले आहे. त्यामध्ये आदिवासी, ठाकूर, समाजदेखील आघाडीवर असल्याचे चित्र दिसून येत आहे. आदिवासी विकास प्रकल्प विभागाने पुढाकार घेत आदिवासी, ठाकूर समाजातील मतदारांना बोलीभाषेतून मतदान करण्याचे आवाहन, मतदानाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सुमारे साडेचार हजार नागरिकांपर्यंत ही जनजागृती करण्यास यश आले आहे.

रायगड लोकसभा मतदार संघातील मतदान सात मे रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत होणार आहे. जिल्ह्यातील दोन हजार १८५ मतदान केंद्रामध्ये मतदान होणार आहे. १६ लाख ६८ हजार ३७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामध्ये महिला आठ लाख ४७ हजार ७६३, महिला आठ लाख २० हजार ६०५ व तृतीय पंथी चार मतदारांचा समावेश आहे.

रायगडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी वेगवेगळ्या सरकारी यंत्रणेबरोबरच खासगी संस्था, संघटनांना आवाहन केले. जिल्ह्यातील आदिवासी, ठाकूर समाजाने देखील पुढाकार घेत या उपक्रमात सहभाग घेतल्याचे चित्र आहे. आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशीकला अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील १५ ठिकाणी ४८ आदिवासी, ठाकूर वाड्यांमध्ये पथनाटय घेण्यात आले. बोली भाषेतून या मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मतदानाचे महत्व पटवून देण्याचे काम करण्यात आले आहे. आतापर्यंत साडेचार हजार नागरिकांपर्यंत हा प्रचार करण्यास यश आल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये सुधागड अलिबाग पेण महाड व रोहा, या ठिकाणी हे उपक्रम राबविण्यात आले आहेत.

## मतदार जनजागृतीकरीता मुरूडमध्ये बाईक रॅली

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

भारत निवडणूक आयोग यांच्या निर्देशान्वये व जिल्हाधिकारी अलिबाग रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड शहरात स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये शहरातील मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून स्वीप कार्यक्रमांतर्गत नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, पाणी पुरवठा व सफाई कर्मचारी यांनी बाईकला मतदाना विषयी जनजागृतीपर संदेश लावून शहरात बाईक रॅली काढली.

रायगड लोकसभा मतदार संघात ७ मे रोजी मतदान असून या दिवशी सर्वांना मतदान करता यावे म्हणुन सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. कोणती ही सबब न देता सर्व जागरुक मतदारांनी कुठल्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करावे व निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजवावा



असे मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज अनिल भुसे यांनी याप्रसंगी मतदारांना आवाहन केले.

सदर रॅलीमध्ये नगरपरिषदेचे पाणी पुरवठा व आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी सोबतच आरोग्य निरीक्षक राकेश पाटील, प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, लिपीक मनोज पुलेकर, संजय वेटकोळी, संजय बामगुडे, सतेज निमकर, मुकादम अभिजीत चांदारेकर, सिटी को-ऑडर्डीनेटर सचिन कोरके आदींसह सर्व कर्मचारी सहभागी झाले होते.

## भरारी पथक व स्थिर पथक ॲक्शन मोडवर

**आगरदांडा :** प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी भरारी पथक,आचारसंहितापथक,स्थिर सर्वेक्षण पथके तैनात करण्यात आली ओत. सध्या ही पथके ॲक्शन मोडवर आली असून प्रत्येकगाड्याचीसखोलतपासणी सुरु केली आहे. प्रत्येक पक्षाच्या उमेदवारावरांच्या हालचालींवर व त्याच्या कार्यकर्त्यांवर तसेच वाहतूक करणाऱ्यांवर व संशयीत गाड्यांची तपासणी करत आहेत. सध्या मुरूड तालुक्यात भरारी पथक व स्थिर पथक ॲक्शन मोडवर आलेला दिसून येत आहे. यावेळी भरारी पथकाचे प्रमुख अमोल दोंदे, भरारी पथक प्रमुख किरण देशमुख, पोलीस उपनिरीक्षक अतुल मडके, प्रकाश आरेकर, दत्ताराम नाईक, मनोज हंबीर, रितेश देशमुख, स्थिर पथक राजेश वाडेकर, नंदकुमार आंबेतकर, रविंद्र सैंदाणे व कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले आहेत.




## खोपोलीत पोलिसांचा रूट मार्च

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी खोपोली, शिळफाटा शहरात पोलिसांनी रुटमार्च केला. लोकसभेच्या निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासंबंधीचे अवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी केले.

मावळ लोकसभेची निवडणूक १३ मे रोजी जाहीर झाली आहे. शांतता सुव्यस्था कायम राहावी राष्ट्रीय एकात्मता वृद्धींगत व्हावी या उद्देशाने खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, वरिष्ठ पोलीस निरिक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली रूट मार्च काढण्यात आला. सकाळी १० वाजता खालची खोपोली अग्निशमन दलाच्या मैदानावरून पथसंचलनास प्रारंभ करण्यात आला.खोपोली बाजारपेठ, शास्त्रीनगर, पाटणकर चौक, समाजमंदीर रोड नंतर शिळफाटा बाजारपेठ, गणेश नगर, पटेलनगरनंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर समारोप करण्यात आला.

याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरिक्षक सुजित गडदे, कर्मराज गावडे, उप पोलीस निरिक्षक सुधाकर लहाने, अलोक किस्मतराव, अभिजीत व्हरंबले, पूजा चव्हाण, गोपनीय विभागाचे प्रदीप खरात, सतीष बांगर, पोलीस हवालदार सागर शेवते, प्रसाद पाटील यांच्यासह सीमा सुरक्षा दल ४७ जवान आणि खोपोली ठाण्यातील ३७ पोलीस अमंलदार उपस्थित होते.

## निवडणूक निरीक्षकांकडून स्टाँगरूमची पाहणी

**महाड :** दुसऱ्या टप्प्यातील मतदान ७ मे रोजी होत असून यामध्ये रायगड लोकसभा मतदारसंघाचा समावेश आहे. महाड येथे निवडणूक निरीक्षक संजीव कुमार झा यांनी भेट देत निवडणूक प्रक्रियेची तयारीची पाहणी केली.

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे निवडणूक प्रक्रिया संबंधित सर्व तयारी सुरू स्टाँग रूम तयार करण्यात आली आहे. इव्हीएम सीलिंगबाबत आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या. यावेळी महाडचे प्रांताधिकारी डॉ.ज्ञानोबा बाणापुरे, तहसीलदार महेश शितोळे आदी उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेसंबंधी पूर्वतयारी काटेकोरपणे सुरू असून नियोजनबद्ध आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचे बाणापुरे यांनी या वेळी सांगितले.

# मावळात फक्त मशाल पेटणार

### शेकाप पदाधिकाऱ्यांसह, मुस्लिम अल्पसंख्याकांनी बैठकीत दिले वचन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदार संघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना लोकसभेत पाठविण्यासाठी मतदारसंघात फक्त ‘मशाल’ पेटणार, असा शब्द खोपोली येथील शेकापपक्षाचे नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष इब्राहिम पटेल आणि मुस्लिम अल्पसंख्याक नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी दिला.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना आणि महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित मुस्लिम अल्पसंख्याक बैठकीस संजोग वाघेरे पाटील यांच्यासमवेत शिवसेना पक्षाचे कर्जत खालापूर विधानसभा उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, माजी नगरसेवक कमाल पटेल, तुराब पटेल, रशीद शेख यांच्यासह शिवसेना पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), काँग्रेस, शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### भांडवलदारांच्या बाजूने जाणारे हे सरकार

**मावळ लोकसभा मतदारसंघातील खोपोली शहरातील पाण्याचा प्रश्न , औद्योगिक, वीज, रस्ते, प्रदूषण, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न आज तागायात सोडविला गेला नाही. ज्या पद्धतीने विकास झाला पाहिजे होता तो झालेला नाही. तरुणांचा नोकऱ्यांचा प्रश्न, शिक्षणाचा प्रश्न आजही मार्गी लागला नाही. शिक्षणव्यवस्था सुधारलेली नाही. शिक्षण क्षेत्रात फी वाढ झाली आहे. त्यावर या सरकारचे नियंत्रण नाही. हे सरकार भांडवल दारांच्या बाजूने चालणारे सरकार आहे. शेतकऱ्यांना पाहिजे, त्या गोष्टी मिळत नाहीत, असे प्रश्न महाविकास आघाडीच्या माध्यमातून मार्गी लावण्याचे आश्वासन उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी यावेळी दिले.**

यावेळी मावळ लोकसभेचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, मी तुम्हाला खात्रीने सांगतो, गेल्या दहा वर्षात आपल्या अपेक्षांचा भंग झाला आहे. मला आपण जे सुचवाल ते करेन अशी ग्वाही दिली. तसेच मी तुमच्या खांद्याला खांदा लावून काम करेन. आपण मतभेद बाजूला सारून जास्तीत जास्त मतदान कराल अशी अपेक्षा व्यक्त केली.

मावळ लोकसभा मतदार संघात गेल्या दहा वर्षांत एकही एतेहासिक विकास काम खासदारांनी केलेले नाही. अनेक कामे रखडलेले आहेत. त्यांनी कायम दुर्लक्ष केले असून आपण खासदार झाल्यानंतर अशी कामे मार्गी लावण्यासाठी प्राधान्य द्यावे, अशा भावना मुस्लिम अल्पसंख्याक नेते आणि कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. दरम्यान, खोपोली शहरातील विविध भागात उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी मुस्लिम समाजातील मान्यवरांच्या भेटी घेतल्या.

# महाराष्ट्र पुरोगामी मुस्लिम समाज संघटनेचा संजोग वाघेरेंना पाठिंबा

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

मावळ लोकसभेचे इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना सर्वसामान्यांकडून उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळत असून त्यांना विविध संघटनांनी ही पाठिंबा दिल्याचे पाहायला मिळत असताना महाराष्ट्र पुरोगामी मुस्लिम समाज संघटनेने संजोग वाघेरे पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. त्या आशयाचे नियुक्तीपत्र महाराष्ट्र पुरोगामी मुस्लिम समाज संघटनेच्या वतीने संजोग वाघेरे यांना शिलफाटा येथील बैठकीत देण्यात आले.



यावेळी राष्ट्रवादीचे अल्पसंख्यांक सेलचे प्रवक्ते नसीम सिद्दिकी, ज्येष्ठ नेते सिराज मेहंदी, सुलतान मालदार, शिराज शेख, साजिद खान, शिवसेना उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, महाराष्ट्र पुरोगामी मुस्लिम समाज संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष इस्माईल युनूस दिवाणी, उपाध्यक्ष शहाबाज लोगडे, कादिर उस्मान खेसे, महिला रायगड जिल्हा अध्यक्ष शबाना मुजम्मिल मुल्ला, ग्रामीण रायगड जिल्हा अध्यक्ष रिजाय नजीर काजले, तालुका कार्याध्यक्ष इम्तियाज मुजावर तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे एकनाथ पिंगळे, संतोष देशमुख, पंकज रुपवते, विलास चालके, संघटक दिलीप पुरी आदी प्रमुखांसह मोठ्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित होता.

# नोटिसांचे नाटक

निवडणूक आयोगाने नरेंद्र मोदी व राहुल गांधी यांच्या भाषणांबद्दल नोटिसा दिल्या आहेत. पण या नोटिसा भाजप व काँग्रेसच्या पक्षाध्यक्षांना दिल्या गेल्या आहेत. इतिहासात पहिल्यांदाच हा प्रकार होत आहे. आयोगाची ही सर्व धडपड अत्यंत केविलवाणी आहे. कोणत्याही स्थितीत मोदींना नोटिसीचा डाग लागू नये अशी ही खटपट आहे. त्यातही केवळ मोदींनाच नोटीस निघाली आहे असे दिसू नये यासाठी लगे हाथ राहुल गांधींनाही नोटीस काढण्यात आली आहे. निवडणूक आयोग ही एक स्वायत्त घटनात्मक संस्था आहे. तिच्या आयुक्तांनी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींप्रमाणे समतोल व गंभीर वर्तन करावे अशी अपेक्षा असते. पण मोदी सत्तेत आल्यापासून आयोगाचा कारभार अजिबात त्याला साजेसा राहिलेला नाही. अनेकदा तर हे आयुक्त आहेत की भाजपचे कार्यकर्ते असा प्रश्न भूतकाळात पडला आहे. मोदींना सभा घेणे सोईचे जावे अशा रीतीने निवडणुकांच्या तारखा आखल्या गेल्याचे आरोप पूर्वी त्याच्यावर झाले आहेत. यंदाच्या निवडणुकीतही आयोगाचे वर्तन फारसे वेगळे नाही, असे खेदाने म्हणावे लागेल. राजस्थानमध्ये मोदींनी गेल्या रविवारी केलेले भाषण अत्यंत आक्षेपार्ह होते. अन्य कोणाही नेत्याने ते केले असते तर त्याच्याविरुध्द दोन समाजात वैमनस्य पसरवल्याबद्दल खटला दाखल झाला असता. अटक झाली असती व पदावरून हाकलण्यात आले असते. पण मोदी हे या सर्व नियमांच्या वर आहेत. काँग्रेसवाले हिंदूंची संपत्ती काढून मुस्लिमांना वाटणार आहे, मुस्लिम म्हणजे अधिक मुले जन्माला घालणारे आणि घुसखोर अशा आशयाची मुक्ताफळे आपल्या पंतप्रधान म्हणवणाऱ्या नेत्यांनी उधळली होती. ती त्यांच्या पदाला तर साजेशी नव्हतीच. पण साध्या सभ्यतेचा, नैतिकतेचा व कायद्याचा भंग करणारी होती. निवडणूक आयोगाने खरे तर याची तात्काळ दखल घेऊन मोदींना भाषणबंदीचे आदेश द्यायला हवे होते. पण तसे घडले नाही.

## आयोगात हिंमत आहे?

आता बरीच टीका झाल्यानंतर मोदींच्या या भाषणाबाबत भाजपचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना नोटीस बजावण्यात आली आहे. या नोटिसीला उत्तर दिल्यानंतर आयोग विचार करीपर्यंत कदाचित निवडणुकीच्या निकालाची तारीख जवळ आली असेल. मोदींना एकट्यालाच नोटीस बजावणे म्हणजे मोदी-भक्तांचा व भाजपवाल्यांचा रोष ओढवून घेणे. आयोगाला ते बहुदा करायचे नसावे. म्हणून राहुल गांधी यांच्या भाषणाबाबतही एक नोटीस धाडण्यात आली. गंमत म्हणजे राहुल यांचे भाषण हे केरळातले आहे व त्यात मोदींवर अशी भाषणे करीत असल्याबद्दल टीका आहे. अशी टीका निवडणुकीच्या काळात सर्वच पक्ष करतात. भाजपवाले तर मानमर्यादा गुंडाळून ठेवून वाटेल त्या थराला जात असतात. पण मोदीभक्तांना बरे वाटावे म्हणून खर्गे यांनाही एक नोटीस पाठवून देण्यात आली. आयोगाच्या या नोटिसांना काहीही किंमत नाही. हे पूर्वीही दिसून आले आहे. उमेदवार किंवा नेते यांच्यावर कारवाई करण्याचे अधिकार आयोगाला आहेत. पण ते आयोगाला वापरायचे नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणात केवळ समज देऊन बऱ्याचदा सोडून देण्यात येते. अर्थात भाजपला समज देण्याचे देखील धाडस आयोगात आहे असे म्हणणे हेच धाडसाचे ठरेल. त्यामुळे लोकांच्या समजुतीखातर नोटिसींचा फार्स पार पडेल इतकेच. तिकडे मोदींची आक्षेपार्ह भाषणे सुरुच आहेत. गुरुवारी मध्य प्रदेशात बोलताना त्यांनी इंदिरा गांधींची संपत्ती मिळावी म्हणून राजीव गांधींनी १९८५ मध्ये वारसाकर रद्द केला असा आरोप केला. तो खोटा आहे. इंदिरा गांधींनी वारशातून मिळालेली संपत्ती १९७० मध्येच नेहरू ट्रस्टला दिली होती. काँग्रेस सामान्य लोकांकडचे पैसे काढून घेऊन इतरांना वाटणार आहे असा प्रचारही त्यांनी चालूच ठेवला आहे. तुमच्याकडे दोन गाड्या किंवा दोन घरे असतील तर त्यातील एक सरकारजमा होईल अशी भीती ते दाखवत आहेत. एक तर काँग्रेसने असे कुठेही म्हटलेले नाही. मोदी ज्या जाहीरनाम्याचा दाखला देत आहेत तो तद्दन खोटा आहे.

## हे म्हणे गरिबांचे बेटे

दुसरे म्हणजे काँग्रेसच काय पण कोणत्याही पक्षाला एकाची संपत्ती काढून दुसऱ्याला देणे या देशात शक्य होणार नाही. या विचाराला अर्बन नक्षल अशी शिवी पंतप्रधानांनी वापरली आहे. हेही त्यांच्या पदाला शोभणारे नाही. निवडणूक आयोग या सर्व काळात डोळ्यावर कातडे ओढून बसणार असेल तर ही घटनात्मक यंत्रणा हवी कशाला असा प्रश्न कोणालाही पडेल. राजकीय पक्षांवर वचक राहावा म्हणून आयोगाला स्वायत्तता देण्यात आली आहे. पण आयोगाच्या आयुक्तांनी हे स्वातंत्र्य व आपली सारासार निर्णयशक्ती गहाण टाकली आहे की काय अशी शंका या घटनांमुळे निर्माण झाली आहे. दरम्यान, मोदींनी ज्या संपत्तीच्या वाटपाचा मुद्दा उपस्थित केला आहे तो खरे तर अत्यंत गंभीर विषय आहे. आज आपल्या देशात एकीकडे ऐंशी कोटी लोकांना फुकट रेशन देण्यात येत आहे. तर दुसरीकडे जगातले सर्वाधिक पाच-दहा श्रीमंत इथेच आहेत. विमानतळ, बंदरे, वीज प्रकल्प, सरकारी कारखाने असे सर्व काही याच श्रीमंतांपैकी एक असलेल्या अदानींना मिळेल अशी व्यवस्था होत आहे. त्याबद्दलच्या आरोपांवर मोदी चकार शब्द बोलायला तयार नाहीत. मात्र काँग्रेसने देशातील श्रीमंतांच्या संपत्तीची मोजणी करू असा इशारा दिला तर मोदींचा तिळपापड झाला आहे. एकीकडे स्वतःला गरीब का बेटा असे म्हणून घ्यायचे आणि गरिबी हटवण्याबाबत किंवा विषमतेबाबत बोलले की आगपाखड करायची हा दुटप्पीपणा झाला. याचा अर्थ स्पष्ट आहे. मोदी हे अदानी किंवा तत्सम श्रीमंती गटाची वकिली करीत आहेत. मात्र थेट यांच्या बाजूने बोलले तर बरे दिसणार नाही हे त्यांना कळते. म्हणून तुमची एक गाडी काढून घेतील असे सांगून मध्यम वर्गाला आपल्याकडे वळवू पाहत आहेत. त्याच्या आडून तीर मारत आहेत. यातला खोटेपणा जनतेला कळतो व कळेलच. तो रोखण्यासाठी विरोधकांना आता केवळ न्यायालयांचाच सहारा उरला आहे.

विचार

# प्रचार अर्थपूर्ण व्हायचा तर...

*वादग्रस्त विधाने आणि कमरेखालचे वार यामुळे निवडणुकीची प्रचारपातळी खालावली आहे. झालेली आणि रखडलेली विकासकामे आणि त्यामुळे जनसामान्यांचे बाधित होत असलेले आयुष्य हा प्रचारसभांमधील हुकमी मुद्दा ठरु शकतो. त्या दृष्टीने सर्वच मान्यवर नेत्यांनी दावे-प्रतिदावे केल्यास ठोस वादविवाद घडून मतदारांच्या विचारांनाही दिशा मिळेल आणि मतदारांना मत कोणाला द्यायचे याचा निर्णय सूज्ञतेने घेता येईल.*



**विठ्ठल जरांडे**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये तापमानातील पारा जसा चढतो आहे, तसाच बेधडक वक्तव्यांमुळे राजकीय तापमानातही वाढ होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानातील बांसवाडा येथे काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर हल्ला केला. त्यांनी घुसखोर आणि अधिक मुले असलेल्या लोकांमध्ये देशाची संपत्ती वाटण्याचे षड्यंत्र असल्याचे म्हटले. मोदी यांनी त्यानंतर हनुमान जयंतीला केलेले भाषण तर मतांच्या ध्रुवीकरणाचा प्रयत्न ठरला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही काँग्रेसवर मुस्लिम तुष्टीकरणाचा आरोप केला आहे. शरिया आणि तिहेरी तलाक पुन्हा लागू करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला. मोदी यांचे भाषण ऐकल्यास उघडउघड ध्रुवीकरणाचा हेतू दिसतो. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आता आजारी आहेत. ते उत्तर देऊ शकत नाहीत, अशा वेळी त्यांच्या एखाद्या विधानाचा आधार घेऊन त्यांच्यावर आणि काँग्रेसवर मुस्लिमधार्जिणे असल्याचा आरोप करणे वादाचा विषय ठरले. त्याचाच आधार घेत विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मोदी यांच्यावर कठोर टीका करत, त्यांची विधाने एका विशिष्ट समुदायाच्या विरोधात असल्याचे म्हटले. तथापि, भाजपने मोदी यांनी फक्त सिंग यांच्या 'संसाधनांवर पहिला हक्क मुस्लिमांचा आहे' या विधानाची आठवण करून दिली होती. एकंदरीत, या ना त्या प्रकारे खरे-खोटे आरोप करत बहुतेक पक्ष सध्या निवडणुकीचे रण तापवत मतदारांना कोड्यांत पाडत असून अनेक नेत्यांच्या बेताल वक्तव्यांमुळे तर कोणाचे मुद्दे रास्त मानायचे असा प्रश्न पडलेला दिसतो. अर्थात बेफाम वक्तव्ये करण्यात ममता बॅनर्जी, उध्दव ठाकरे, तेजस्वी यादव यापैकी कोणीही मागे नाही.

भारतीय निवडणुकांमध्ये प्रचाराप्रसंगी संयम सोडणे ही नवीन बाब नाही. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' अशा घोषणा देणाऱ्या पंतप्रधानांनी भारतातील १४० कोटी जनतेला विरोधकांच्या जाहीरनाम्याची भीती दाखवणे कोड्यात पाडून गेले. समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून पंतप्रधानांच्या आक्षेपात तथ्य नाही. मात्र त्यातून काँग्रेसच्या जाहीरनाम्यात दडलेले तुष्टीकरण उघड झाले आहे. गेल्या दहा वर्षांपासून त्यांचे काँग्रेस पक्षाच्या ध्येयधोरणांमध्ये फारसे योगदान नाही. शिवाय ते आजारी आहेत. अशा परिस्थितीत त्यांची विधाने खरोखरच वादविषय म्हणून समोर आणणे आवश्यक आहे का, याचा विचार व्हायला हवा. सध्याच्या सरकारने उज्ज्वला, शौचालय बांधणे किंवा खाते उघडणे यात हिंदूंना प्राधान्य दिले नाही, मुस्लिमांना वंचित ठेवले नाही. जे काही केले ते सर्वांसाठी केले आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी तसेच भाजप आघाडीने काय केले हे जगासमोर आहे. अशा वेळी धार्मिक ध्रुवीकरणाऐवजी विकासकामांचा प्रसार अधिक कामाचा ठरु शकतो, हे वास्तव आहे.

देशात सच्चर समितीपासून कुरेशी समितीपर्यंत झालेल्या अभ्यासांमध्ये शिक्षण, नोकरी, मालमत्ता आणि रोजगार इत्यादी बाबतीत मुस्लिम समाज मागासलेला आहे, या तथ्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. भारतातील हिंदू, बौद्ध आणि शीख यांच्या ते पुढे नाहीत. डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार भारतात क्रोनी-भांडवलशाहीला प्रोत्साहन देण्यासाठी कुप्रसिद्ध ठरले. त्यांच्या राजवटीत झालेल्या घोटाळ्यांमुळे सरकार कोसळले. अण्णा हजारे यांचे आंदोलन झाले, लोकपालाची चर्चा झाली. यावर मोदी टीका करु शकतातच. त्यामुळे ज्येष्ठ नेत्यांनी तरी भरीव मुद्द्यांवर भर द्यावा असे वाटते. पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा राष्ट्रपती या पदांवर कोणीही असले, तरी त्यांनी थोडा संयम बाळगावा आणि त्यांच्या पदाचा आदर करावा अशी अपेक्षा असते. खुद्द पंतप्रधानांनी त्यांची लक्ष्मणरेषा ओढावी. मुख्यमंत्री असताना मोदींभोवती संशयाचे वर्तुळ होते. पंतप्रधान या नात्याने त्यांनी अरब देश, मुस्लिम समुदाय, अल्पसंख्याकांसह सर्वांच्या हिताची बात केली, ही चांगली गोष्ट आहे. त्यांनी फुटकळ मुद्द्यांवर अडकून राहू नये, असे वाटते. वास्तविक भाजपच्या जाहीरनाम्याचीही तुलना व्हायला हवी. मतदार हुशार आहे. प्रश्न तटस्थ मतदारांना आपला मुद्दा समजावून सांगण्याचा आहे. हे करण्याचे दोनच मार्ग आहेत. तुमची रेषा मोठी करा किंवा दबंगगिरी करून दुसऱ्याची रेषा लहान करा. दुर्दैवाने आज अनेक राजकारणी दुसरा मार्ग अवलंबत आहेत.

निवडणूक लोकसभेची असो वा विधानसभेची; निवडणुकीतील भाषणांचा दर्जा सतत खालावत आहे. नेत्यांना कोणतीही शेलकी विशेषणे बहाल करण्यापर्यंत मजल गेली आहे. प्रचार हा कार्यक्रमावर आधारित असायला हवा. देश, राज्यातील प्रश्नांवर बोलले जायला हवे; परंतु आता प्रचार व्यक्तिगत पातळीवर आला आहे. उमेदवार आणि नेत्यांकडून एकमेकांची निंदानालस्ती केली जात आहे. एकमेकांना दूषणे देण्यावर भर दिला जात आहे. महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगालमधील प्रचार तर हिणकस पातळीवर गेला. शाहू महाराज गादीचे खरे वारस नाहीत, इथपासून नाची, डोळे मारणारी, बंटी, बबली, डान्सर अशा शेलक्या विशेषणांचा वापर प्रचारात केला जात आहे. निवडणूक आयोग स्वतः काही करत नाही. तक्रारी येण्याची वाट पहात राहतो, असे चित्र दुर्दैवाने पुढे येत आहे. निवडणुकीतला प्रचार दिवसेंदिवस शाब्दिक पातळीवर हिंसक होत चालला आहे. बिहारमध्ये तेजस्वी यादव यांच्यासमोर चिराग पासवान यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करण्यात आली, ती निषेधार्हच आहे. चिराग यांची भूमिका महत्त्वाची आहे. ते म्हणतात, आई फक्त माझी नाही. प्रचारात माझ्यावर टीका करण्यात काहीच हरकत नव्हती; परंतु आईवरून शिवीगाळ करणे योग्य नाही. तेजस्वी यांच्या जागी मी असतो आणि त्यांच्या कुटुंबाला कोणी शिवीगाळ केली असती, तर मी चोख प्रत्युत्तर दिले असते, असे सांगताना राबडीदेवी माझ्यासाठी आई आहेत, असे त्यांनी म्हटले. हे मनोगत केवळ तेजस्वी यांच्यावर टीका करण्यासाठी नाही, तर एखाद्या सभेत कोणी शिवराळ बोलत असेल, तर प्रमुखांनी त्याला रोखले पाहिजे, हे सांगण्यासाठी आहे.

निवडणुकीत सारे काही क्षम्य आहे, असे मानून चालणार नाही. शिवीगाळ होऊनही चिराग पासवान यांनी दाखवलेली शालीनता कौतुकास्पद आहे; ज्यांच्या सभेत हे घडले, त्या तेजस्वी यादव यांनी संबंधितांना समज देऊन दिलगिरी व्यक्त केली असती, तर त्यात त्यांचे मोठेपण दिसले असते; परंतु या घटनेवर तेजस्वी यादव यांची परिपक्व प्रतिक्रिया समोर आली नाही. ही बाब त्यांची असंवेदनशीलता दर्शवते. बिहारमध्ये अशी घटना पहिल्यांदाच घडली, असे नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये नितीशकुमार यांच्या 'डीएनए'मध्येच घोटाळा असल्याचा आरोप करून अशीच असंवेदनशीलता दाखवून दिली होती. प्रचारादरम्यान काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मोदींची तुलना रावणाशी केली. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी राहुल गांधी यांची तुलना सद्दाम हुसेनशी केली होती. बिहारमधील घटना त्याहून दोन पावले पुढे आहे. पुढारी एकमेकांना काही तरी बोलतात आणि एकमेकांच्या माता-भगिनींना शिव्या घालतात. हा 'डीएनए' घोटाळा आणि 'पनौती-पनौती'च्या नारेबाजीच्या दोन पावले पुढे राहिलेला प्रकार आहे.

बिहारमध्ये क्वचितच अशी निवडणूक असेल, ज्यामध्ये जंगलराजचा उल्लेख नसेल. भाजप आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार लालूयादव आणि राबडीदेवी यांच्या राजवटीला जंगलराज म्हणतात. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील भाजपच्या प्रचारासाठी बिहारमध्ये पोहोचताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकांना जंगलराजची आठवण करून देण्यास सुरुवात केली. एका निवडणुकीत मोदी यांनी तेजस्वी यादव यांना 'जंगलराजचा राजकुमार' असेही संबोधले होते. चिराग यांनी मात्र असे बोलणे टाळले. २०२० च्या निवडणुकीत तेजस्वी यादव यांनी आपल्या वडिलांचा फोटो बॅनरवरून आणि पोस्टरवरून काढून टाकला होता. इतकेच नाही, तर २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी तेजस्वी यांनी जंगलराजबाबत अनेकदा जनतेची माफीही मागितली होती; मात्र लोकांनी तेजस्वी यादव यांना माफ केले नाही आणि पुन्हा नितीशकुमार यांच्याकडे सत्ता सोपवली. तेजस्वी यादव यांच्या सभेत चिराग यांना शिवीगाळ केल्याप्रकरणी लोकजनशक्ती पक्षाने निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

नरेंद्र मोदी, राहुल गांधी किंवा अन्य नेत्यांना सकारात्मक मुद्द्यांवर प्रचार पुढे नेता येणार आहे. झालेली आणि रखडलेली विकासकामे आणि त्यामुळे जनसामान्यांचे बाधित होत असलेले आयुष्य हा तर प्रचारसभांमधील हुकमी मुद्दा ठरु शकतो. त्या दृष्टीने सर्वच मान्यवर नेत्यांनी दावे-प्रतिदावे केल्यास ठोस वादविवाद घडून मतदारांच्या विचारांनाही दिशा मिळेल आणि प्रचार रास्त मुद्द्यांवर पोहोचून मतदारांना आपले मत कोणाला द्यायचे याचा निर्णय सूज्ञतेने घेता येईल.

आजकाल

# आणि अखेर कोटक महिंद्राला शिक्षा

**संजीव चांदोरकर**

बजाज फायनान्स, आयआयएफएल, महिंद्रा फायनान्स, कोटक महिंद्रा... यादी वाढतच आहे !

काय आरबीआय, देशातील कोट्यवधी गरीब कुटुंबासाठी देखील ''रेग्युलेटरी बँक ऑफ इंडिया'' होईल काय?

गेल्या काही महिन्यात आरबीआय ने एकामागून एक बँकिंग आणि एनबीएफसी क्षेत्रातील दादा वित्तसंस्थांना आपला बडगा दाखवला आहे;

नोटबंदी, आपले संचित भांडवल केंद्र सरकारला देणे, निरव मोदी पासून अनेक घोटाळे आणि काही एमबीएफसी / बँका कोसळणे हे सगळे दिवसा ढवळ्या झाले आणि आरबीआयची कृतीशून्यता पुन्हा पुन्हा समोर आली. पण आता आरबीआय काही कृती करू लागली आहे; जे खरेतर तिचे घटनादत्त कर्तव्यच आहे.

निरव मोदी प्रकरणात पंजाब नॅशनल बँक, आयएलएफएस पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळणे, येस बँकेला बेल औट करायला लागणे, दिवाण हौसिंगच्या प्रवर्तकांनी पंजाब महाराष्ट्र सहकारी बँकेला खाऊन टाकणे. अशी एकामागून एक प्रकरणे घडत गेली; या सगळ्यात सामायिक धागा कोणता होता तर आरबीआयच्या निष्क्रियतेचा सर्वसाधारणपणे आरबीआय सारखी नियामक मंडळे एखाद्या बँकेच्या / एनबीएफसीच्या व्यवहारात नियमांचे पालन केले नाही असे आढळले तर दंड ठोठावत असे, आणि अमुक एक काळात तुमचे व्यवहार सुधारा असा प्रेमळ सल्ला देत असे. या दंडाची रक्कम फारशी जाचक नसल्याने या बँका/वित्तसंस्था दंड भरत आणि आरबीआयचे सुधारणेचे सल्ले फारसे गांभीर्याने घेत नसत

आता आरबीआयने स्ट्रॅटेजी बदलेली आहे;

आपल्या नियमांना न जुमानणाऱ्या बँका/एनबीएफसी/क्रेडिट कार्ड/पेमेंट बँका ज्यांना ज्या जागी दुखेल तेथेच मार देत आहे. त्यांना दुखते जेव्हा त्यांच्या धंद्यावर, नफ्यावर परिणाम होतो.

यांच्या धंद्यावर परिणाम करण्यासाठी त्यांना काही ऍक्टिव्हिटी करण्यावर निर्बंध घातले जात आहेत.

गेल्या काही वर्षात, विशेषतः गेल्या काही महिन्यात शिक्षा केलेल्या बँका/कंपन्या

बँक ऑफ बरोडा, मास्टर कार्ड, एचडीएफसी, पेटीएम, बजाज फायनान्स, जे एम फायनान्स, आयआयएफएल, महिंद्रा फायनान्स, कोटक महिंद्रा, आरबीआय ने काही ऍक्टिव्हिटी वर बंदी आणल्यानंतर या बँका/कंपन्यांचा धंदा किमान काही काळासाठी थिजणे, त्यांच्या शेयर किमतीवर परिणाम होणे हे परिणाम होत आहेत. मी वाट बघत आहे आरबीआय मायक्रो फायनान्स क्षेत्रात हस्तक्षेप करण्याची वित्त निरक्षर, भारतभर पसरलेल्या कोट्यवधी गरीब कुटुंबाना न झेपणारी कर्जे बँका/स्मॉल फायनान्स बँका/मायक्रो फायनान्स/एनबीएफसी/गोल्ड लोन कंपन्या/क्रेडिट कार्ड कंपन्या पाजत आहेत.

कर्ज घेणाऱ्याची फारशी क्रेडिट एसेसमेंट न करता लाखो कोटी रुपयांची सूक्ष्म कर्जे पम्प केली जात आहेत ; ती परतफेड करण्यासाठी लागणारी पुरेशा उत्पन्नाची साधने या कोट्यवधी गरीब नागरिकांकडे नाहीत. आधीची कर्जे फेडण्यासाठी नवीन कर्ज घेण्याच्या दुष्टचक्रात / कर्ज सापळ्यात हि कुटुंबे फसू शकतात. यांना कोणीही वाली नाही; त्यांना स्वतःचे संरक्षण करण्याची कुवत नाही; फक्त नियामक मंडळ हस्तक्षेप करू शकते.

हा अजेंडा आरबीआयच्या टेबल आला तरच आरबीआय देशातील कोट्यवधी कुटुंबांबद्दल संवेदनशील आहे असे म्हणता येईल. बसमध्ये सेठ आपली सोन्याची बॅग छातीशी कवटाळून बसला होता.

व्हाटसअप वर मेसेज येऊ लागले कि अजून काही अंतरावर एक चौकी लागणार आहे. त्या चौकीवर नवीन स्टाफ आलेला आहे.

आणि त्या चौकीवर बस थांबवली जाईल आणि बसची झडती घेतली जाईल. त्यानंतर कदाचित बसचा ड्रायव्हर देखील बदलला जाईल , कारण आताच ड्रायव्हर दहा तास सतत बस चालवत असल्यामुळे आरटीओच्या नियमाप्रमाणे त्याला ब्रेक देणे सर्वांच्या हिताचे असणार आहे. नवीन ड्रायव्हर बस अपेक्षित उजव्या रस्त्याने न नेता डाव्या रस्त्याने काढेल. कारण उजवा रस्ता धोक्याचा झाला आहे. बस कलंडण्याची भीती आहे. डावा रस्ता थोडा लांबचा असला तरी सेफ आहे. बस वेगाने देखील जाऊन अंतर कापू शकते

शेठने व्हाट्सअप वरील मेसेज कडे आधी दुर्लक्ष केले. ड्रायव्हरला ओरडून सांगितले कि त्या चौकीवर अजिबात बस थांबवायची नाही. पण मेसेजची फ्रिक्वेन्सी वाढली. त्याने आपल्या हेड ऑफिसला फोन करून शहानिशा केली. हेड ऑफिसने देखील कन्फर्म केले कि चौकी आहे आणि तेथील स्टाफ विकत घेतला जाऊ शकत नाही.

लोकसंसद

## अजितदादांना साक्षात्कार झाला?

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा कोट्यावधी रुपयांचा शिखर बँक व सिंचन घोटाळ्याचा ईडीमार्फत तपास सुरू आहे. त्यांच्या ह्या घोटाळ्यामुळे, तेव्हाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्यावर अनेक आरोप करून तांडव केले. इतकेच नव्हे तर त्यांना तुरूंगात चक्की पिसायला पाठवणार होते. तर देशाचे बाहुबली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तर, महाराष्ट्रात येऊन त्यांच्यावर कोट्यावधी रूपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप करून वाभाडे काढले. यावरून आता तुरूंगात जाण्याशिवाय पर्याय नाही असे दिसताच पक्षातील खासदार आमदारांना फोडून भाजप सरकारच्या युतीत ते सामील झाले. तेव्हापासून त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या देशाचे अवतार पुरूष, जगद्गुरू वगैरे असे वाटायला तर, लागेलच पण ते जगात लोकप्रिय असे नेते असून अशी माणसे सतत जन्माला येत नसतात. मोदी ही एक दैवी शक्ती आहे. मी राजकारणात अनेक नेते पाहिले. पण मोदींसारखा नेता नाही. अशी स्तुतीसुमने अजित पवारांनी उधळून मोदी अंध भक्तांच्या यादीत प्रथम क्रमांक पटकाविला. हा अजितदादांना थोड्याच दिवसात आलेला साक्षात्कार समजावा की भाजपाचा चमत्कार समजावा.

**- राजेंद्र लकेश्री, मुंबई**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**सत्तावीस एप्रिल**

**१८५३ :** लेखक, ख्यातनाम भारतीय गणिती आणि ज्योतिष बा दिक्षित यांचा जन्म २१ जुलै १८५३ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मुरुड या गावी झाला. प्राथमिक शिक्षण दापोलीत झाल्यावर पुण्याच्या मराठी ट्रेनिंग स्कुलमधून मॅट्रिकची परिक्षा पास झाले. त्यानंतर ब्रिटिश सरकारच्या शिक्षण खात्यात नोकरी पत्करले. पुढे पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजात अध्यापक दाखल झाले. इथे गणिताच्या अभ्यासाबरोबर ज्योतिषशास्त्राची आवड निर्माण झाली. पुढे भारतीय ज्योतिषशास्त्राच्या इतिहासाचा आढावा घेऊन भारतीयज्योतिषशास्त्राची ओळख हा महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांच्या हातून साकारला. **१८९८:-** लेखक, ख्यातनाम भारतीय गणिती आणि ज्योतिष शास्त्रज्ञ शं.बा.दिक्षित यांचे निधन. भारतीय ज्योतिषशास्त्राच्या इतिहासाचा आढावा घेऊन 'भारतीय ज्योतिषशास्त्र' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांच्या हातून साकारला. यात वेद काळापासून चालू घडामोडी पर्यंतचा इतिहास त्यांनी कथन केला. याशिवाय 'पंचांग शोधन', 'नक्षत्रसंख्या', 'अंकगणित' या भारतीयांनी जगाला दिलेल्या गोष्टी असल्याचे त्यांनी सप्रमाण सिध्द केले. प्राचीन भारतीय भूगोलावर आधारित 'भारतभूवर्णन' हे त्यांचे आणखी एक महत्त्वपूर्ण पुस्तक. याशिवाय मॅक्समुल्लरच्या पुस्तकाचे दोन भागांतील भाषांतर 'घर्ममीमांसा' या नावाने केली. त्यांच्या ग्रंथातून चिकित्सक शोधक दृष्टी, प्रखर बुध्दिमत्ता दिसून येते. **१९३६:-** संशोधक, समीक्षक सुरेश रामकृष्ण चूनेकर यांचा जन्म. मराठी संशोधन पत्रिकेचे संपादन त्यांनी काही काळ केले. साहित्य अकादमीसाठी 'माधव ज्युलियन' परिचयग्रंथ लिहिला. 'सूचीची सूची', 'सहा साहित्यकार', 'अंतरंग' हे त्यांचे अन्य ग्रंथ. याशिवाय चुनेकर यांनी प्रा.अ.का. प्रियोळकर यांच्या वाङ्मयीन सूची, बाळकृष्ण अनंत भिडे यांच्या कविता व वाङ्मयीन सूची, तसेच 'संशोधन : स्वरुप आणि पध्दती' हा ग्रंथ. अशी ग्रंथसंपदा. **१९४१:-** संगीता विश्वनाथ जोशी यांचा जन्म. यांचा 'म्युझिका' हा काव्यग्रंथ प्रसिध्द. तसेच मेनका मासिकात 'शम्मे महफिल' हे सदर लिहिले. त्या उर्दु काव्याच्या जाणकार आहेत. **१९४२:-** लोकहितवादींचे नातू, प्रवचनकार, संतकाव्याचे अनुवादक केशवराव रघुनाथ देशमुख यांचे निधन. 'नारद भक्ती सूत्र', 'हरिपाठ', 'अनुभवामृत', 'चांगदेव पासष्टी', तुकारामाचे अभंग आदीचे प्रसंगोप्राप्त विवेचन ते करत. त्यांनी ज्ञानेश्वरी, हरिपाठ, चांगदेव पासष्टी, नारदभक्तीसूत्रे यांचे सुलभ अनुवाद केले होते. यातील ज्ञानेश्वरीविषयक विवेचनावर आधारलेला 'ज्ञानेश्वरीचे सुलभ गद्यरुपांतर (भाग १ ते ३) ग्रंथ प्रसिध्द झाला. तथापि, अमृतानुभवाचे गद्य रुपांतर अद्यापही त्यांचे प्रकाशित झाले नाही. **१९५३:-** विविध वृत्तपत्रातून कथा-कादंबरी, ललित आदी स्वरुपाचे लेखन करणाऱ्या लेखिका शुभांगी गोपाळ गानू यांचा जन्म. ह्यांचा 'संचित', 'कुणाच्या खांद्यावर' 'सांजसोबती', 'वादळ' ह्या कथासंग्रहासह 'शोधू कशी', 'किनारा', 'स्वयंसिध्द', 'मी निर्दोष आहे', 'कर्मयोगी' या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. तसेच तरुण भारतमधून एक बाल कांदबरी त्यांची प्रसिध्द झाली आहे. **१९६६:-** लेखिका डॉ.कल्पना सतीश बेवणे यांचा जन्म. पेशाने डॉक्टर. यांचे 'लोकप्रभा' या साप्ताहिकातून कथा प्रसिध्द तसेच 'पक्षी दूर जा-ताना' हा काव्यसंग्रह प्रकाशित. **१९८३:-** लेखक ॲड. प्रशांत भाऊराव गणवीर यांचा जन्म. पेशाने वकील असणाऱ्या गणवीर यांचा 'झोपलेला वाघ' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९८३:-** नाटककार, कथाकार, अनुवादक, कादंबरीकार भार्गवराम विठ्ठल वरेरकर अर्थात मामा वरेरकर यांचा जन्म. 'कुंजबिहारी' हे पहिले नाटक. 'हाच मुलांचा बाप', 'संन्याशाचा संसार', 'तुरुंगाच्या दारात', 'करीन ती पूर्व', 'सत्तेचे गुलाम', 'सोन्याचा कळस', 'सारस्वत', 'जिवाशिवाची भेट', 'भूमिकन्या सीता', 'अ-पूर्व बंगाल' आदी नाटके. 'गतभर्तृका' या टोपणनावानं त्यांनी लिहिली. 'विधवाकुमारी' ही कादंबरी अतिशय खळबळजनक ठरली. एकूण २७ कादंबऱ्या मामांनी लिहिल्या. 'धावता धोटा', 'गोदू गोखले' या गाजलेल्या कांदबऱ्या. 'स्वैरसंचार', 'षोडशी', 'वैमानिक हल्ला व इतर गोष्टी' हे कथासंग्रह. 'शरदश्चंद्र चट्टोपाध्याय', 'बंकीमचंद्र', 'प्रभातकुमार चट्टोपाध्याय', 'रवींद्रनाथ टागोर' यांचे अनुवाद केले. 'महात्माज मिरॅकल' या महात्मा गांधीच्या जीवनकार्यावरील भारतातील पहिल्या अनुबोधपटापासून अनेक चित्रपट वरेरकरांनी केले. 'दुनिया', 'पूर्णिमा', 'शिलेदार' आदी नियतकालिकांचे संपादन. 'पद्मभूषण' पुरस्कारानं सन्मानित. **१९८९:-** आधुनिक वैद्यक, होमिओपॅथी, आयुर्वेद, योग, निसर्गोपचार यावर नियतकालिकांतून सातत्याने लेखन करणारे लेखक, वक्ते डॉ. रमेश विष्णू रानडे यांचा जन्म. 'औषधे कणभर' या ग्रंथातून त्यांनी ॲलोपॅथिक औषधांचे दुष्परिणाम आणि होमिओपॅथीचे सुपरिणाम यावर विवेचन केले तसेच 'होमिओपॅथीची पायवाट' हा ग्रंथ प्रसिध्द. **१९९२:-** समीक्षक व कथा-कांदबरीकार विश्वनाथ वामन पत्की यांचे निधन. नऊ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांना गुरुतुल्य असणाऱ्या ना. सी. फडके यांच्या कार्यवेध 'युगप्रवर्तक फडके' मधून घेतला, तसेच सी. डी. देशमुखांच्या आत्मचरित्राचा अनुवाद केला.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

पान १ वरुन

## गोंधळपाड्यातील महिलेचा खून

तिने केलेल्या कामाचे राहिलेले पैसे मिळावे यासाठी ती महिला ठेकेदार मल्लीकार्जुन यांना भेटली. गुरुवारी (दि.२५) रात्री नऊ वाजण्याच्या अगोदर पैसे देणे, घेण्यावरून शाब्दिक वाद झाला. मल्लीकार्जुन याने रागाच्या भरात तेथील कोणत्यातरी हत्याराने तिच्या डोक्यात वार केला. त्यामध्ये ती बेशुद्ध झाली. तिला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता, डॉक्टरांनी तिला अगोदरच मृत असल्याचे घोषित केले. याप्रकरणी व्यंकटेश किसन पवार यांनी मल्लिकार्जुन यांच्याविरोधात तक्रार देत त्यानेच कमलाबाईचा खून केल्याची फिर्याद मांडवा पोलीस ठाण्यात नोंदविली आहे.

## मुरुड तालुक्यात शेकापचा झंझावात

तटकरे यांनी मागील लोकसभा निवडणुकीत शेकापचे सहकार्य घेऊनही नंतरच्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला फसवल्याने उमेदवार पंडित पाटील यांना पराभव पत्करावा लागला. त्याचा वचपा या निवडणुकीत घ्यायचा असल्याची भूमिका पक्षाच्या नेत्यांनी घेतली आहे. दरम्यान, आ. जयंत पाटील यांनी तालुक्याचा आढावा घेऊन कार्यकर्त्यांना यावेळी मार्गदर्शन केले. ठिकठिकाणी यावेळी आ. जयंत पाटील यांना कार्यकर्त्यांनी उत्तम प्रतिसाद दिल्याचे समजले. यावेळी शेकापचे माजी सभापती चंद्रकांत कमाने, मनोहर बैले, तुकाराम पाटील, राहिल कडू, इम्तियाज मलबारी, जमीर कादिरी, रिझवान फहिम, एजाज उलडे, कॉंग्रेसचे तालुका उपाध्यक्ष अस्लमभाई हलडे, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे सुदेश घुमकर, रा.कॉं.शरद पवार गटाचे नौशाद शाबान, हाफिजुल कबले सैफुल्ला फिरफीरे, हनिफ लांबाते आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## ग्रामीण भागातील महिलांना दिलासा

पूर्ण होऊन, घराघरात नळ कनेक्शन दिल्याने ग्रामीण भागातील महिलांना दिलासा मिळाला असल्याचा दावा रायगड जिल्हा परिषद प्रशासनाने केला आहे. जनतेला स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, तसेच गावातील महिलांचा त्रास कमी व्हावा, यासाठी केंद्र सरकारमार्फत जलजीवन मिशन ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने चांगलीच कंबर कसली आहे. या योजनेमध्ये प्रतिदिन प्रतिमाणसी किमान ५५ लीटर याप्रमाणे पाण्याची उपलब्धता करणे अपेक्षित आहे. जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची कामे गुणवत्तापूर्वक पूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाच्या माध्यमातून नियमित योजनानिहाय कामांची माहिती घेण्यात येत आहे. अधिकारी कामांना भेटी देऊन कामाची पाहणी करीत आहेत. या योजनेच्या माध्यमातून १५ तालुक्यांमध्ये १ हजार ४९६ योजनांची कामे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्यावतीने हाती घेण्यात आली आहेत. यामधील ६१३ योजनांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या सर्व योजनांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करून, योजना संबंधित ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची कामे गुणवत्तापूर्वक पूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाच्या माध्यमातून नियमित योजनानिहाय कामांची माहिती घेण्यात येत आहे. अधिकारी कामांना भेटी देऊन कामाची पाहणी करीत आहेत.

## निवडणुकीमुळे लाखोंची उलाढाल

चूक लक्षात आणून दिल्यावर उमेदवारांनी ती मान्य करत सुधारणा केली.

उमेदवाराचे नाव, पक्षाचे नाव, उमेदवाराचा अंतिमतः मान्य खर्च रक्कम असा दिला आहे. सुनील दत्तात्रेय तटकरे-राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी २१ लाख ९२ हजार १०४ रुपये, अनंत गंगाराम गीते-शिवसेना (उ.बा.ठा.) ६ लाख ७६ हजार ९२० रुपये, कुमुदिनी रवींद्र चव्हाण वंचित बहुजन आघाडी ८६ हजार ९२० रुपये, कर्नल प्रकाशराव चव्हाण भारतीय जवान किसान पार्टी २५ हजार ७१० रुपये, अजय उपाध्ये अपक्ष २५ हजार १०० रुपये, अमित श्रीपाल कवाडे अपक्ष २९,७००रुपये, अंजनी अश्विन केळकर अपक्ष २७,१०० रुपये, मंगेश पद्माकर कोळी अपक्ष २५,१६० रुपये, पांडुरंग दामोदर चौले अपक्ष २५,१०० रुपये, नितीन जगन्नाथ मयेकर अपक्ष २५,१०० रुपये, श्रीनिवास सत्यनारायण मट्टपती अपक्ष २७,७३० रुपये, अनंत पद्मा गीते अपक्ष २५,१०० रुपये, अनंत बाळोजी गीते अपक्ष २५,१०० रुपये इतका खर्च केला आहे. आता टोप्या, झेंडे, बॅनर, बिल्ले, पुष्पगुच्छ, मंडप डेकोरेटर्स, हॉटेल व्यावसायिकांना काम वाढले आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार उमेदवारांच्या प्रचारासाठी केलेल्या खर्चाची तपासणी किमान तीन वेळा करणे बंधनकारक आहे. त्यानुसार, यानंतरची दुसरी तपासणी दिनांक ३० एप्रिल रोजी आयोजित केली जाणार आहे. जिल्हा नोडल अधिकारी, (खर्च) राहुल केशव कदम, जिल्हा खर्च संनियंत्रण समिती सदस्य, तसेच सर्व विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक खर्च निरीक्षक आपल्या पथकासह उपस्थित होते.

## पेणमध्ये कावीळचे थैमान

तो भोगावती नदीमधून केला जातो. ते पाणी निर्जंतुकीकरण केले जाते, मग पेण शहराकडे येणाऱ्या नागरिकांमध्ये काविळच्या विषाणूंचा प्रादुर्भाव का आढळतोय. याबाबत आरोग्य विभागाने तपासणी केल्यावर एक भयाण सत्य समोर आलेय, तो म्हणजे रस्त्यावर उभ्या असणाऱ्या हातगाड्यांवरील शीतपेय. एकीकडे सूर्य आग ओकत आहे. तापमानाने ४२ अंश पार केले आहे. दुसरीकडे मोठ्या प्रमाणात लग्नसराई सुरू आहे. त्यामुळे लग्नात येणाऱ्या वऱ्हाड्यांना थंडपेयाबरोबर थंड पाणी द्यावे, अशी अपेक्षा वधू-वर पक्षाची असते. त्यामुळे पेण तालुक्यात कळत-नकळत बर्फाचा तुटवडा भासू लागला आहे. कारण, पूर्ण पेण तालुक्यात एकच बर्फ निर्माण करण्याचा कारखाना आहे. त्यामुळे बर्फ पुरविणे त्या कारखान्याला शक्य होत नाही. तेथून सर्रास खाण्यायोग्य नसणाऱ्या बर्फाची विक्री होत आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. हा बर्फ शहरात आणि शहराच्या बाहेर उभे असणाऱ्या शीतपेयाच्या गाड्यांवर वापरला जात आहे. हा बर्फ अशुद्ध पाण्याने तयार करत असल्याने सर्रास या शीतपेयातून काविळसारख्या साथीच्या आजाराने पेण तालुक्यात थैमान घातले आहे, अशी चर्चा आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, खाण्यासाठी आईसक्यूबचा वापर करणे गरजेचे असते; परंतु आईसक्यूब हा कच्च्या बर्फापेक्षा महागडा असल्याने रस्त्यावरील शीतपेय विक्रेते आईसक्यूबचा वापर करत नाहीत. कमी पैशाने मिळणाऱ्या कच्च्या बर्फाचाच वापर करतात. पूर्वी कच्च्या बर्फाला आकाशी कलर असायचा, त्यामुळे तो कच्चा बर्फ आहे असे सहज समजायचे. परंतु, आता पैसे कमवायच्या हव्यासापोटी बर्फ कारखानदारदेखील कच्च्या बर्फाला आकाशी कलर देत नाहीत. याचाच फायदा शीतपेय विक्रेते घेतात आणि कच्चा बर्फच शीतपेयामध्ये वापरतात. आणि, या शीतपेयामार्फत काविळचा प्रादुर्भाव ग्रामीण भागामध्ये होत आहे. कार्यालयात कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने आम्ही बर्फ बनवणाऱ्या कारखान्याची तपासणी करू शकत नाहीत. हे मान्य करतो; परंतु शुद्ध पाण्यापासून बनवलेला बर्फच वापरावा. तसेच बर्फ शुद्ध पाण्यापासून बनवणे बंधनकारक आहे.

**- मारुती घोसळवाड, सहायक आयुक्त, अन्न आणि औषध प्रशासक, रायगड**

## पाण्यासाठी सरपंच आक्रमक

केला जातो. मात्र, गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी या पाणीप्रश्नाबाबत पुढाकार घेत चारही गावांतील आजी-माजी पदाधिकारी, सदस्य व प्रशासक यांना बोलावून त्यांची एकत्रित बैठक शुक्रवारी (दि. २६) घेतली. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता टेंबुरकर यांना या बैठकीत पाचारण करण्यात आले. चारही गावांना होणारी पाणीटंचाई, महिलावर्गाची मोठ्या प्रमाणावर होणारी गैरसोय याची जाणीव त्यांना करून दिली. हर्षदा मयेकर यांनी आक्रमक पवित्रा घेत नागरिकांच्या पाण्यासंबंधीत होणाऱ्या गैरसोयीबद्दल अधिकाऱ्यांना जाब विचारला. धरणाचे नाही तर टँकरद्वारे तरी नागरिकांना पाणीपुरवठा करून द्यावा. पाणीपुरवठा होत नसेल, तर या कालावधीत पाणीपट्टी माफ करण्यात यावी, अशी भूमिका घेतली. चारही ग्रामपंचायतींमधील ग्रामस्थांना टँकरद्वारे पाणी मिळावे यासाठी तात्काळ भूमिका घेण्यात यावी, अशी सक्त ताकीद त्यांना दिली. उमटे धरणातील गाळ कधी काढणार, गावांना पाणी कधी मिळणार, आतापर्यंत गाळ काढण्यासाठी किती पैसे खर्च झाले, आदी प्रश्नांचा भडिमार करण्यात आला. चारही गावांना पाणीपुरवठा झाला नाही, तर येत्या आठ दिवसांनंतर आंदोलन करणार असल्याचा इशारा मयेकर यांनी दिला. यावेळी चारही ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांनी पाठिंबा दर्शविला आहे. येत्या मंगळवारी चारही गावांचे सरपंच व सदस्य जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरवर्षी भेडसावणारा पाणीप्रश्न कायमचा मार्गी लावण्यात यावा, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील आदी पदाधिकारी, सदस्य व महिला उपस्थित होत्या.

## अपघातात एक ठार, एक जखमी

गाव हद्दीत आल्यानंतर दुचाकी चालक महेंद्र याचा गाडीवरून ताबा सुटला आणि गाडी रस्त्यावर घसरत गेली. दुचाकीवर मागे बसलेले दिगंबर हे रस्त्यावर आपटले. त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला, तर चालक महेंद्र हे किरकोळ जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक शाखा पोलीस महाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त वाहन बाजूला करत जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. उदय धर्मा म्हात्रे, रा. कुठारी, ता. पनवेल, जि. रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - करंजघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| २०/२ अ/१ | ०-२५-०० | ४.३१ |
| २०/२ अ/२ | ०-२२-८० | ४.०० |
| २०/२ ब | ०-२६-०० | ५.०० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक: २७/०४/२०२४

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. रामदास पांडुरंग बोराडे वगैरे व जगन्नाथ नारायण बोराडे वगैरे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १७ | ३ क | ०-१३-०० | ०=०९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६/०४/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे माणकिवली, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमीन मिळकत आमचे अशिल यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक कन्हैयालाल रामभजन गुप्ता व १ यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| २२९ | क्षेत्र ०-१९-३०<br>पोटखराबा ०-०१-५०<br>एकूण क्षेत्र ०-२०-८० | १.२५ |

वरील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्यकोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी कर्जत

ता. २७/०४/२०२४.

सही / -
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू), ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

### जाहीर सूचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. बाळु हरी धुळे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे सावळे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ५/१ एकुण ०.५०.९० गुंठे व सर्व्हे नं ५/६ एकूण ०.०२.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

**दिनांक २७/०४/२०२४**

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे, तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनिल आत्माराम घरत यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| तळवली ता. मुरुड | २५३ | जिरायत ०-३८-७०<br>पो.ख. ०-०२-८०<br>एकूण क्षेत्र ०-४१-५० | १०.०६ |

दिनांक :- २७/०४/२०२४
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

दि. २६/०४/२०२४

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक सौ. सुरेखा शरद पाटील यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विकी व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| भिसे ता. रोहा जि. रायगड | १४६ | ०-२३-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-२४-०० | ५.४० |

वर वर्णन केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड.आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर), पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. रमेश बारकु बुटेरे व २. श्री. सुर्याजी दादा बोराडे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्रीम. गुलाब पंढरीनाथ बोराडे वगैरे ५ यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. एकसळ, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ६५ | २२ | ०-२५-४०<br>पो.ख. ०-०२-७० | ३-२२ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. २७/०४/२०२४

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत, जि. रायगड
मो.-९३२५०६००३७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे कोळगाव ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रभाकर रघुनाथ भगत यांच्याकडून माझ्या अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|
| कोळगाव ता. अलिबाग जि. रायगड | ४१७ | ०-२१-२०<br>पो. ख ०-००-५०<br>एकूण ०-२१-७० |

तरी वरील संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, बक्षीस, लीज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध नाही. अगर असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक- २७/०४/२०२४

**ॲड. आशिष संदीप रानडे**
रा. रानडे निवास तात्या रानडे मार्ग
शिवलकर नाका अलिबाग-रायगड
मो. नंबर - ९२७०२९४५४५

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२७ एप्रिल
१) श्रीम. सुप्रिया प्रशांत घरत
चेंढरे, अलिबाग, २७-४-१९६२



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत ही जमिनीचे विद्यमान मालक श्री. केशव जयराम मानकवळे यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी आलेली आहेत

**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा - रायगड, पोट तुकडी पेण, मौजे मौजे बरवणे येथील गट नं. ७६ त्यासी क्षेत्र १-६५-८० हे.आर. चौ.मी. आकार रु. ६-९२ पैसे पैकी श्री. केशव जयराम मानकवळे यांचे हिश्श्याचे क्षेत्र ०-७०-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशीपासून १५ (पंधरा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-७०-० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध आहे असे समजुन माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण- रायगड.
दि. २७/०४/२०२४

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील.**
पद्मावती कॉम्प्लेक्स, शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७
मो.नं. ९८८१९१५२१९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली निवासी सदनिका व त्या सदनिकेचे मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे-चेंढरे ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ९६, हिस्सा नं.१/क/५ प्लॉट नं. ४ व ५ वरील प्रभात दर्शन को. ऑप. हौ. सोसायटी बी विंग मधील फ्लॅट नं. १२, पहिला मजला, क्षेत्र ५४९ चौ.फुट बिल्टअप (५१.०२ चौ. मी.) ज्याचा ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. ९५०/५ ही निवासी सदनिका या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर निवासी सदनिकेवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तीने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ४ (चार) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची निवासी सदनिका ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

अलिबाग
तारीख : २६/०४/२०२४

**ॲड. सचिन दिनकर पाटील**
बी.ए.एल.एल.बी मुंबई
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२२६८७२६९०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे- नेणवली, ता.सुधागड, जि.रायगड येथील जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.निखिल हनुमंत बेलोसे<br>रा. पाली, ता. सुधागड, जि. रायगड. | ११५/१२ | ०-८१-००<br>पैकी<br>०-४९-०० | ०-२५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येण प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- २७/०४/२०२४

सही/-
खरेदीदाराचे /लेखक,
**श्री.सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
६९९ जमना निवास, पाली ता. सुधागड, जि. रायगड.
मो.९४२११६८७६३/९२७०३६७२९०

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वैजाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.संजयकुमार मारूती पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वैजाळी | ३४५ | १-०३-६०<br>पो. ख. ०-११-३०<br>१-१४-९० | २१.५३ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवरइ अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २७/४/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

**निवडक**

## पनवेल परिसरात घरफोडी

**पनवेल :** पनवेल परिसरात दोन ठिकाणी अज्ञात चोरट्याने केलेल्या घरफोडीत लाखो रुपये किमतीचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. येथील हॉलमार्क मोटर लिंकस् शोरुममधून लिनोव्हा कंपनीया लॅपटॉप, नोकिया कंपनीचा मोबाईल फोन, जीवो कंपनीचा मोबाईल फोन व रोख रक्कम असा एक लाख ८१ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला आहे. दुसऱ्या घटनेत विशाल हुडाई वर्कशॉपमध्ये चोरी करून त्या ठिकाणाहून २ हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली आहे.

## दुचाकींमध्ये घडला अपघात

**पनवेल :** पनवेल जवळील मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून शिवशंभो नाक्यावरून डाव्या बाजूने पनवेलमध्ये जाणाऱ्या रस्त्यावर पंचरत्न चौकात एका स्कुटी गाडीवरील चालकाने मोटार सायकलीस धडक देऊन झालेल्या अपघातात मोटार सायकलींवरील दोघेजण जखमी झाले.स्कुटीवरून चाललेल्या चालकाने त्याच्या पुढे चाललेल्या मोटार सायकलीस पाठीमागून ठोकर मारून झालेल्या अपघातात रोमियो पॅट्रिक डेव्हिड व शैल्डेन वेगस हे दोघेजण जखमी झाले आहेत.

## डंपरची एसटीला धडक

**पनवेल :** पनवेलजवळ एका डंपरने एसटीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. पनवेल जवळील उरण -पनवेल जुन्या रोडने गव्हाण फाटा ते पाडेघरच्या रस्त्यावर एका डंपरवरील चालकाने कच्च्या रस्त्याने मुख्य रस्त्यावर त्याच्या ताब्यातील डंपर घेऊन येत असताना त्याने एसटीला डाव्याबाजूने समोर ठोकर मारून झालेल्या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## हिवताप दिन साजरा

**आगरदांडा :** मुरूड-आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्रात हिवताप दिन साजरा करण्यात आला. यावेळी आरोग्य सेवक सुशील ठाकुर यांनी सांगितले की जनजागृतीने हिवतापाला मिटवु या, डासांच्या नियंत्रणासाठी साचलेल्या पाण्यात गप्पी मासे सोडणे, थांबलेल्या नाल्यांचे पाणी वाहते करणे, डब्यक्यात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. यावेळी वैद्यकीय अधिकारी उज्वलदिप बांबर्डे, आरोग्य सहाय्यक संतोष नागांवकर, आरोग्य सेविका उज्वला रणदिवे, सोनाली मोरे आदी उपस्थित होते.

## ‘संतांचे आशीर्वाद महत्वाचे’

**खांब :** जीवनात मोठे होण्यासाठी संतांचे आशीर्वाद महत्वाचे असल्याचे भक्तीमय मार्गदर्शन ह.भ.प.महेंद महाराज शास्त्री भगवानगड यांनी भाविक भक्तांना संबोधित करताना केले. रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे येथे संपन्न झालेल्या हनुमान जन्मोत्सव कार्यक्रमसंपन्न झाला.या हरिकिर्तनरुपी सेवेप्रसंगी मारूती कोलाटकर, कृष्णा थिटे, भाऊ दळवी, रवी मरवडे, माऊली महाराज, प्रफुल्ल महाराज, ज्ञानेश महाराज, पेटकर महाराज, नारायण लोखंडे, ज्ञानेश्वर लोखंडे आदी उपस्थित होते.

# वाढत्या उन्हाच्या कचाट्यात पशुधन

**। पाली/गोमाशी। वार्ताहर।**

**उन्हाच्या काहीलेने माणसांबरोबरच पशुपक्षी व जनावरांची देखील वाताहत झाली आहे, अशा परिस्थितीत शेतकरी व पशुपालकांनी आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन विभागातर्फे करण्यात आले आहे आणि या संदर्भात मार्गदर्शक उपाययोजना व सूचना देखील जारी करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात माहिती जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड डॉ. सचिन देशपांडे यांनी दिली.**



### या उपाययोजना आवश्यक

जनावरांना शक्यतो सकाळी व संध्याकाळी ऊन कमी असताना चरण्यास सोडावे. हवामानपुरक सुधारित गोठे बांधावेत, गोठ्याची ऊंची जास्त असावी जेणेकरून गोठ्यात हवा खेळती राहील. छप्पराला शक्यतो पांढरा चुना लावावा. तसेच त्यावर पालापाचोळा, पाचट टाकावे. ज्यामुळे सूर्याची किरणे परावर्तीत होण्यास मदत होईल.

### बैलांना मशागतीसाठी उन्हात काम नको

बैलांकडून शेतीची मशागतीची कामे शक्यतो सकाळी व संध्याकाळी कमी उन्हात करून घ्यावीत. यावेळी त्यांना पाणी जास्त प्रमाणात उपलब्ध होईल याची काळजी घ्यावी. आवश्यकतेनुसार पाण्यामध्ये मिठाचा वापर करावा.

### उष्माघाताने जनावरांवर होणारे परिणाम

१. भरपूर पाणी पिण्याकडे कल
२. कोरडा चारा न खाणे
३. हालचाली मंदावणे
४. सावलीकडे स्थिरावणे
५. शरीराचे तापमानात वाढ
६.जोरात श्वास घेणे
७. भरपूर घाम येणे
८. उत्पादनात कमी येणे
९. प्रजनन क्षमता कमी होणे
१०. रोगप्रतिकार शक्ती कमी

> उष्माघातापासून होणारे पशुधनाचे नुकसान टाळण्यासाठी रायगड पशुसंवर्धन विभाग सज्ज आहे. पशुसंवर्धन विभागाने याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत, कृपया त्याची पशुपालकांनी अंमलबजावणी करावी, जेणेकरून उष्माघात टाळता येईल. तरीसुद्धा जिल्ह्यात कोणतीही अशी बाब आढळून आल्यास तात्काळ नजीकच्या तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय किंवा पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी१, श्रेणी २ यांना संपर्क करून बाधित जनावरांवर उपचार करून घ्यावेत.
>
> डॉ. सचिन देशपांडे
> जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड, अलिबाग

उन्हाच्या ताणामुळे जनावरांची भूक मंदावते. त्यामुळे शक्यतो थंड वातावरणात त्यांना चारा टाकावा. म्हशीच्या कातडीचा काळा रंग व घामग्रंथींच्याकमीसंख्येमुळेउष्णतेचा त्रास त्यांना गाईपेक्षा जास्त होतो. त्यामुळे त्यांची अधिकची काळजी घ्यावी. योग्य पशुआहार, मुरघासचा वापर, निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करून दिल्यास उन्हाळ्यात सुद्धा आवश्यक दुग्ध उत्पादन मिळवणे शक्य आहे. जनावरांना वेळोवेळी जंतनाशक औषध पाजावे, जनावरांचे नियमितपणे लाळ्या खुरकुत, घटसर्प, फऱ्या, पीपीआर, आंत्रविषार इत्यादी रोगप्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. पशुखाद्यामध्ये मिठाचा वापर व पाण्यामध्ये इलेक्ट्रोलाइट यांचे योग्य मिश्रण करून वापरावे. तसेच दुधाळ पशूंना संतुलित पशुआहार यासोबत खनिज मिश्रणे द्यावेत. चाऱ्यामध्ये एकदम बदल करणे टाळावे.पक्ष्यांच्या घरट्यामध्ये तापमान नियंत्रक व्यवस्था असावी. मृत जनावरांची विल्हेवाट लावताना ती जागा पाण्याच्या तलावापासून, सार्वजनिक ठिकाणापासून दूर व संरक्षित असावी आणि तेथे या संबंधीच्या आवश्यक माहितीचा फलक असावा. अशी माहिती पशुसंवर्धन विभागाने दिली.

## सिताराम सितापराव यांचे निधन

**। पाली । वार्ताहर ।**

कासारवाडी येथील रहिवासी उद्योजक सिताराम सखाराम सितापराव यांचे मंगळवारी (दि.२३) अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७२ वर्षाचे होते. त्यांचे पश्चात पत्नी तीन मुलं, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शून्यातून विश्व निर्माण करणारे उद्योजक सिताराम सितापराव यांच्या अचानक जाण्याने नागोठणे शहरासह कासारवाडी गावावर शोककळा पसरली आहे. त्यांचे अंत्ययात्रेसाठी नागोठणे पंचक्रोशीसह तालुक्यातून त्यांचे सगेसोयरे मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचे दशक्रिया विधी गुरुवारी (दि.२) उद्धर येथे होणार असून उत्तरकार्य रविवारी (दि.५) नागोठणे येथील राहते घरी होतील.



## आगरी बोलीतील नाट्य कलाकृती २९ एप्रिलला होणार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील रांजणपाडा येथील गावदेवी मरूआईच्या यात्रेनिमित्त आणि स्वर्गीय बाबीबाई त्रिंबक पाटील यांच्या स्मरणार्थ अष्टगंध कला मंच उरण नवीमुंबईच्या वतीने ‘गाव कजा परक्यांची मजा’ या आगरी बोली भाषेतील नाट्यकलाकृतीचा पहिला प्रयोग रांजणपाडा येथील श्री हनुमान मंदिराच्या भव्य प्रांगणातसादर करण्यात येणार आहे.

सदर नाटकाचे लेखन व दिग्दर्शन नाटककार हसूराम पाटील यांनी केले आहे. तर सहदिग्दर्शन चेतन पाटील यांचे आहे. नाटकात हसूराम पाटील, दिगंबर कोळी, प्रसाद कडू, रोशन घरत, नवनीत माळी, कृष्णकांत म्हात्रे, चेतन पाटील, अशोक म्हात्रे, जयकिसन मोकल, बाळ, दत्तात्रेय घरत, रमेश कोळी, वैशाली मोहिते, परिशा सरोदे, रुचिता म्हात्रे आणि प्रफुल्ल आदी कलाकार आपल्या अभिनयातून भूमिका साकारणार आहेत. या नाटकाला आनंद कुबल यांचे संगीत लाभले आहे.

नेपथ्य राजा जोशी, रंगभूषा अमृत म्हात्रे, ध्वनी रामचंद्र पाटील, हरेश पाटील, रंगमंच व्यवस्था संतोष साऊंड सर्विस यांची आहे. ग्रामस्थ मंडळ रांजणपाडा, ड्रीम फाउंडेशन, स्वराज मित्र मंडळ, जय हनुमान क्रिकेट क्लब या सर्वांचे सौजन्य लाभले आहे. या नाट्यप्रयोगाच्या उद्घाटनप्रसंगी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, नाट्य, धार्मिक अशा विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती स्वागताध्यक्ष तथा अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे, सचिव दत्तात्रेय घरत, मार्गदर्शक हासूराम पाटील यांनी दिली.

# रोहा, पेणमधील तीन विद्यार्थीनी चमकल्या

■ **बॅचलर ऑफ डिझाईनच्या पदवी अभ्यासक्रमासाठी निवड**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अहमदाबाद येथील युनायटेड वर्ल्ड इन्स्टीट्युट ऑफ डिझाईन येथे बॅचलर ऑफ डिझाईनच्या पदवी अभ्यासक्रमासाठी तीन विद्यार्थीनींची निवड झाली आहे. देशभरातील ९० हजार विद्यार्थ्यांमधून रायगडमधील या तीन मुलींची निवड झाल्याने त्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

तनवी पाटील व वेदिका पेडणेकर रा. पेण तसेच सिध्दी पवार रा. रोहा असे या तीन विद्यार्थीनींची नावे आहेत. अहमदाबाद येथील युनायटेड वर्ल्ड इन्स्टीट्युट ऑफ डिझाईन शिक्षण संस्थेत ४८० जागांसाठी देशभरातून सुमारे दीड लाख विद्यार्थीनी अर्ज केला होता. त्यात रायगड जिल्ह्यातील सात विद्यार्थ्यांचा समावेश होता. या प्रवेशासाठी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली. डिझायन संबंधित पूर्व परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत सहा विद्यार्थ्यांची निवड झाली. त्यानंतर डिझाईन संबंधित केलेले काम, वेगळा दृष्टीकोन याबाबतचे प्रात्यक्षिक सादरीकरण झाले. त्यानंतर मुलाखत झाली. या मुलाखतीमध्ये तन्वी पाटील, वेदिका पेडणेकर, आणि सिध्द पवार या तीन विद्यार्थीनीनी यश संपादन केले. या तिघींची निवड अहमदाबाद येथे युनाटेड वर्ल्ड इन्स्टीट्युट ऑफ डिझायन या संस्थेत झाली असून हा अभ्यासक्रम चार वर्षाचा आहे. डिझायनबाबत वेगवेगळ्या प्रकारचे धडे या चार वर्षात घेतले जाणार असल्याचे श्रेयस पाटील यांनी सांगितले.



## पेट्रोल पंपाशेजारी लागली आग

**। खोपोली। प्रतिनिधी ।**

इंसाबा फाट्यावरील पेट्रोल पंपाच्या मागच्या बाजूला आग लागल्याची घटना घडली. घटनास्थळी तातडीने टाटा स्टील कंपनीचा अग्निशमन दल वेळेत पोहचल्याने आग अटोक्यात आली असून मोठा अनर्थ टळला आहे.गवताने पेट घेतल्यानंतर इंडियन ऑईल पेट्रोलपंपाच्या मागच्या बाजूपर्यंत आग पोहोचली होती. यादरम्यान पेट्रोल पंपातील कामगारांनी सतकर्ता दाखवत आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. टाटा स्टील कंपनी, आलाना कंपनीचे अग्निशमन दल वेळेत पोहचल्याने आग अटोक्यात आली असून मोठा अनर्थ टळला आहे.

# मुरूडमध्ये नाचवतात मानाच्या शासनकाठ्या

■ **चार दिवस जत्रेचा धुरळा ; तर करोडोंची उलाढाल !**

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मराठी नववर्षाच्या पहिल्याच चैत्र महिन्यात मुरूडसह तालुक्यातील गावागावातून मानाच्या शासन काठ्या नाचवल्या जातात. चार दिवस उत्साहात होणाऱ्या जत्रेतून करोडोंची उलाढाल होत असते.

चैत्र शुद्ध पौर्णिमेच्या आदल्या दिवशी मुरूडची ग्रामदेवता श्रीकोटेश्वरी देवीच्या पालखी सोहळ्यापासुन या उत्सवाला सुरुवात होते. दुसऱ्या दिवशी चैत्र पौर्णिमेला तेलवडे गावात जत्रा होते, तिसऱ्या दिवशी खार आंबोली व शेवटी शिघ्रे गावात जत्रा होते. मुरुड, तेलवडे, खार अंबोली, शिघ्रे अशी चार गावांत सलग चार दिवस जत्रोत्सव असतो. या चैत्र महिन्यात शासन काठ्या नाचवण्याची परंपरा शेकडो वर्षांपासून सुरू आहे ती आजतागायत जपली जात आहे.



तालुक्यातील सुमारे १२ ते १५ गावातील शासन काठ्या या जत्रेत वाजत गाजत, नाचत येतात, जत्रेत आल्यावर मंदिराभोवती प्रदक्षिणा घालत असताना शासन काठी नाचवली जाते कधी एका हातावर घेऊन, कधी खांद्यावर, कधी डोक्यावर तर कधी हनुवटीवर हे पाहण्यासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी होत असते. ही काठी नाचवताना उंच उंच आभाळात अभिमानाने डौलत कधी जमीनीच्या दिशेने पडत असते. त्यावेळी बघणाऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकतो आणि काठी सांभाळणारे पुन्हा काठी आभाळाच्या दिशेने उभी करून नाचवू लागतात. हा चित्तथरारक अनुभव पहाणाऱ्यांना येत असतो.

या जत्रेमध्ये विविध स्टॉल लावले जातात. यामध्ये मिठाई, भजी, कटलरी, आईस्क्रीम, उसाचा रस, सौंदर्य प्रसाधने, नाव गोंदवणे, विविध प्रकारचे कपडे, घरगुती सामान, विविध लहान मुलांचे खेळ यांचा समावेश असतो. त्यामुळे या जत्रेत मोठ्या उत्साहात लाखो लोक भेट देतात. चार दिवसात करोडोंची उलाढाल होत असते.

## रस्त्यांवर गतिरोधक बसविण्याची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

करंजाडे वसाहतीतील सेक्टर १ ते ६ या मुख्य रस्त्यावर वाहतूक नियंत्रणात आणण्यासाठी व अपघात टाळण्यासाठी गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी सिडको कार्यकारी अभियंता यांच्याकडे केली आहे.

करंजाडे वसाहतीमध्ये नव्याने रस्त्यांची डांबरीकरण करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. मात्र मुख्य रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वाहनचालकांच्या मनमानीला लगाम बसत नसून वाहने अतिशय वेगाने जातात. या मार्गावर अपघात होण्याची दाट शक्यता देखील नाकारता येत नाही. त्यामुळे डांबरीकरण करण्याचे काम सुरु असतानाच रस्त्यावर मुख्य ठिकाणी गतिरोधक बसवावेत, अशी मागणी केली आहे.

# प्रधान सचिवांनी केली जि.प. शाळांची पाहणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथील गट साधन केंद्र, नवगाव, झिराड, वायशेत व कुरुळ येथील जिल्हा परिषद शाळांना भेट दिली. यावेळी त्यांनी शाळेच्या कामकाजाची माहिती घेत शैक्षणिक गुणवत्तेचीदेखील पाहणी केली.



यावेळी प्रकल्प संचालक सिध्देश वाडकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी महारुद्र नाले, प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव, उपशिक्षणाधिकारी सुनिता चांदोरकर, सुनील भोपाळे, संतोष शेडगे, विस्ता अधिकारी कल्पना काकडे, डी.एल. साळावकर, अलिबागचे गट शिक्षणाधिकारी, कृष्णा पिंगळा, केंद्र प्रमुख प्रमोद भोपी, विनायक पाटील, संजय पोईलकर, समग्र शिक्षा सर्व कर्मचारी उपस्थित होते.

अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा झिराड, रायगड जिल्हा परिषद शाळा नवगाव, रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा वायशेत, रायगड जिल्हा परिषद शाळा कुरुळ, गट साधन केंद्र कुरुळ येथील आयसीटी लॅबची पाहणी केली. पाहणी दरम्यान विद्यार्थ्यांना शासनाकडून प्राप्त झालेल्या अध्ययन समृद्धी पेटी व त्यातील साहित्य किती शाळा आणि विद्यार्थी अध्यापनात वापर करतात या अंतर्गत विचारणादेखील करण्यात आली. तसेच रोबोटिक किड्स, जादुई पेटारा, सायन्स लॅब, व्हर्च्युअल क्लासरूम, स्मार्ट क्लास,आदी उपक्रम, वॉल कंपाऊंड, क्रीडा साहित्य इत्यादी विषयी माहिती घेऊन विद्यार्थी, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, अध्यक्ष, शिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्ह्यात येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या.

## साडेबावीस लाखांची केली फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर।**

शेअरट्रेडींगमध्ये आमची कंपनी अधिकचा नफा मिळवून देईल, असे आमिष दाखवून खांदेश्वर वसाहतीमध्ये राहणाऱ्या ४४ वर्षीय व्यक्तीला साडेबावीस लाखांना फसविण्यात आले आहे. या ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्ह्यात पोलीस भामट्यांचा शोध घेत आहेत.

खांदेश्वर वसाहतीमधील ४४ वर्षीय इसमाला ऑनलाईन ट्रेडींग कंपनीच्या नावाने फोनवर संपर्क साधला गेला. त्यांची फसवणूक करण्यासाठी भामट्यांनी दोन वेगवेगळे मोबाईलनंबर वापरले. मोबाईलवरील व्हॉट्सअॅपवरुन अयान अन्सारी व अहमद या दोन व्यक्तींनी त्यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांचा विश्वास संपादनासाठी इंडीयन डीमॅट खाते असल्याचे सांगण्यात आले. सध्या मिळत असलेल्या नफ्यापेक्षा अधिक नफा अल्ट्रा ग्लोबल मार्केट या कंपनीत पैसे गुंतविल्यास नफा मिळेल, असे सांगून त्यांची साडेअठरा लाख रुपये भरायला सांगितले. व त्यानंतर पुन्हा वेगवगेळ्या कारणांद्वारे पैसे मागून साडबावीस लाखांची फसवणूक केली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- ‘इंद्रप्रस्थ’ गोंधळपाडा येथे सफाईकामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण- इंद्रप्रस्थ, गावदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४.
- अलिबागमध्ये घरकामासाठी बाई पाहिजे वेळ: ८-३० ते ५-३० कॉन्टॅक्ट मो. + ९१ ९५४५८४७२१२
- रेवदंडा येथे बाजारपेठेत भातगिरणीची जागा शेडसहीत विकणे आहे. एरिया- ४.५० गुंठे (NA) संपर्क : मोतीलाल जैन- ८४४६८८००२५
- कुकूचकू पोल्ट्री फार्म निजामपूर माणगाव रायगड येथे पिल्ले च्या पीक अप गाडीवर ड्रायवर पाहिजे पगार सर्व साधारण रूपये २५,००० प्रती महिना मिळेल कुटूंबासहित राहण्याची सोय आहे. संपर्क : अनुष्का राऊत ७७९८८८३८६४
- क्षितीज बंगला, विद्यानगर (तांत्रिक विद्यालयामागे) 1BHK भाड्याने देणे आहे. (गाडी पार्किंग उपलब्ध) ९९६९८२८२३९/९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# श्रीपंत सांप्रदायाची त्रिसूत्री रायगडातील घराघरात

**थोर संतश्रेष्ठ सद्गुरू श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांचा अवधूत सांप्रदाय रायगड जिल्ह्यात घराघरात पोहोचविणारे गुरूवर्य सुभानराव तथा अण्णा राणे यांच्या ४२ व्या पुण्यतिथीनिमित्ताने त्यांना वाहिलेली आदरांजली.**

रायगड जिल्ह्यात विविध सांप्रदाय आहेत. पण, श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांचा अवधूत सांप्रदाय तळागाळापर्यंत पोहोचला तो सर्वस्वी गुरूवर्य सुभानराव तथा अण्णा राणे यांच्यामुळे. भजनपरंपरेच्या माध्यमातून हा सांप्रदाय संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचला आहे. पण, रायगड जिल्ह्यात या भजनपरंपरेसोबतच श्रीपंत बोधाच्या माध्यमातून श्रीपंत सांप्रदाय गुरूवर्य सुभानराव तथा अण्णा राणेंनी ‘पायाचीया सेवा करावी ही आस’ या पंतपदाप्रमाणे बोधस्वरूप सद्गुरू साबाजीदादा शेडगे यांच्या मदतीने तो घराघरात नेला.

रायगड जिल्ह्यात जो श्रीपंत सांप्रदाय आला तो कोल्हापूर येथील सद्गुरू रामानंद महाराज यांच्यापासून गजानन महाराज (कोल्हापूर),विष्णूमहाराज(बिसूर-सांगली), साबाजीदादा शेडगे (मुंबई), गुरूवर्य अण्णा राणे (पेझारी) या गुरू-शिष्य परंपरेतील सर्वच सत्पुरूषांनी श्रीपंत महाराजांचे भजन एकतारी भजनाच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचले. पेझारी परिसरात गुरूवर्य अण्णा राणे हे देखील पंतसेवेचा वसा जपण्यासाठी एकतारीवर श्रीपंत पदे म्हणत सर्वांकडे जायचे.



मुंबईतील शिवडी नाक्यावर टेलरिंग व्यवसाय, प्रजा समाजवादी पक्षाचे काम केलेल्या अण्णांनी रायगड जिल्ह्यातील पेझारी येथे आल्यावर आपले संपूर्ण आयुष्य श्रीपंत सांप्रदाय तळागाळापर्यंत आणि घराघरात पोहोचविण्यासाठी समर्पित केले. ‘प्रेम देणे, प्रेम घेणे, प्रेमची हा व्यवहार सर्वही प्रेमाचा बाजार’ या श्रीपंत महाराजांच्या पदाप्रमाणे गुरूवर्य अण्णांनी सांप्रदाय विस्तारासाठी अनेक माणसे जोडली.

कित्येकांच्या जीवनातील नैराश्य, अंधश्रध्दा दूर करून त्यांना सद्गुरूभक्तीकडे वळविले. त्यांना श्रीपंत महाराजांचा बोध करून त्यांचे आयुष्य सुखी व समाधानी केले. समाजात व्यसनमुक्ती करून समाजाला व्यसन गुरूचे लागले मजला, नाठवे संसार कैसा सजला

या श्रीदत्त प्रेमलहरीतील श्रीपंत महाराजांच्या पदाचा अर्थ समजावून सांगितला. मुक्या प्राण्यांना व जनावरांना ही त्यांनी आपलेसे केले. असंख्य जणांच्या शंकांचे निरसन गुरूवर्य अण्णा राणे यांनी श्रीपंत बोधाच्या रसाळ वाणीतून केले. अण्णांची दृढ पंतभक्ती, भजनलालसा पाहून परिसरातील असंख्य लोक त्यांचा आशिर्वाद घेण्यासाठी येऊ लागले. कित्येकांच्या जीवनातील ते आधारस्तंभ बनले. लोक अण्णांना गुरूस्थानी मानू लागले. गुरूवर्य अण्णांनी रायगड जिल्ह्यात प्रामुख्याने भजनपरंपरेच्या माध्यमातून सांप्रदाय घराघरात पोहोचविला.

श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांची २७३० पदे श्रीदत्त प्रेमलहरी या भजनगाथेच्या माध्यमातून शब्दबद्ध केलेली आहेत. गुरूवर्य अण्णांची यातील बहुतांश पदे अगदी मुखोद्गत होती. हीच श्रीदत्त प्रेमलहरी गुरूवर्य अण्णांनी रायगडातील घराघरात पोहोचवून सर्वसामान्यांना पंतभक्तीच्या प्रवाहात सामील करून घेतले. वामन नरहर कामत या श्रीपंत महाराजांच्या शिष्याने श्रीपंत गुरूचरित्र पोथी ही लिहीली.

या पोथीचे पारायण रायगड जिल्ह्यात घराघरात सुरू करण्याचे कार्य गुरूवर्य अण्णांनी केले. सद्गुरूभक्ती, बंधुप्रीती, आत्मशांती ही श्रीपंत सांप्रदायाची त्रिसूत्री रायगडातील घराघरात पोहोचविण्याचे कार्य गुरूवर्य अण्णा राणे यांनी केले. आज लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वच जण श्रीपंत पोथीच्या पारायणात अगदी मनोभावे सहभागी होतात. २००७ साली गुरूवर्य सुभानराव राणे यांच्या पुण्यतिथीच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त रायगड जिल्ह्यात १०८ एकदिवसीय पोथी पारायणांचा संकल्प करण्यात आला होता. पण, प्रत्यक्षात १९० हून अधिक श्रीपंत पोथीची एकदिवसीय पारायणे संपन्न झाली.

गुरूवर्य अण्णांनी श्रीपंत सांप्रदायाचा प्रचार व प्रसार करताना भजनसेवा व बोध याच्याही पुढे जाऊन सर्व पंतभक्त एकत्र यावेत यासाठी श्रीगुरू प्रेमा तुझा थोर असं म्हणत श्रीदत्तजयंती, श्रीपंत जन्मोत्सव, सद्गुरू साबाजीदादा शेडगे यांचा पुण्यतिथी उत्सव, अध्यात्मिक मेळावे यासारखे अनेक कार्यक्रम सुरू केले. की जेणेकरून हा आपला श्रीपंत सांप्रदाय अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल. १९५० च्या दशकात श्रीपंत सेवेचा वसा हाती घेतलेल्या गुरूवर्य सुभानराव तथा अण्णा राणे यांनी अनेकांना जीवनाच्या उच्चकोटीकडे नेणारा श्रीपंत सांप्रदायाचा मार्ग दाखविला. व गुरूवर्य अण्णा राणे १९८२ साली एप्रिल महिन्यात चैत्र वद्य संकष्टी या दिवशी श्रीपंत चरणी लीन झाले. त्यानिमित्ताने गुरूवर्य सुभानराव तथा अण्णा राणे यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

# ही आहे लोकशाही

मुलांनो, आपला देश लोकशाही तत्त्वांचे पालन करणारा आहे. आपली लोकशाही अतिशय समृद्ध असल्यामुळे जगात आदर आहे. लोकशाही असल्यामुळेच मतदारांना थेट मत व्यक्त करता येते. सध्या देशात निवडणुका सुरू असल्याचे तुम्ही जाणत असाल. लोक आपला निर्णय देण्यासाठी थेट मतदान करू शकतात आणि आपला प्रतिनिधी निवडतात. मुलांनो, भारतात जगातील सर्वात मोठी लोकशाही तसेच युनायटेड स्टेट्समध्ये जगातील सर्वात जुनी लोकशाही ही दोन्ही प्रातिनिधिक लोकशाहीची उदाहरणे आहेत. प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये प्रतिनिधी लोकांच्या बाजूने निर्णय घेतात. लोकशाही म्हणजे निर्णय घेणाऱ्या सदस्यांसाठी न्याय्य गोष्टी ठरवण्याचा एक मार्ग आहे.



**जाणून घ्या**

वर्षानुवर्षे लोकशाहीची कल्पना विकसित झाली असली तरीही केंद्रीय तत्त्व समान आहे. यात लहान शहरे आणि राज्यांमध्ये तसेच संपूर्ण देशांसाठी तत्त्वे समान राहतात. इच्छा असणारे लोक निवडणुकीला उभे राहतात. जिंकले तर देश चालवण्याची जबाबदारी त्यांच्या अंगावर येते. थोडक्यात लोकशाही हा निर्णय घेण्याचे व्यवस्थापन करण्याचा एक मार्ग आहे. यात प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. खाण्यासाठी काही निवडण्यापासून ते देश म्हणून आपण काय करतो ते निवडण्यापर्यंत प्रत्येक स्तरावर हे तंत्र कार्य करते. दुर्दैवाने, अगदी अलीकडेपर्यंत लोकशाही प्रत्येकासाठी नव्हती. अगदी १०० वर्षांपूर्वीपर्यंत युनायटेड स्टेट्समध्ये महिलांना मतदान करण्याची परवानगी नव्हती. परंतु हळूहळू बहुतेक प्रस्थापित लोकशाहींमध्ये प्रत्येकाचा समावेश करण्यासाठी योग्य तो विस्तार झाला.

# बेटांनी बनलेला देश

**सफर देशांची**

छोट्यांनो, तुमच्याच देशातल्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी बोटीचा वापर करावा लागला तर? शहरातल्या बाजारात जाण्यासाठीही बोटच लागली तर? आश्चर्य वाटलं ना? इंडोनेशियामध्ये असं होतं. कारण इंडोनेशिया हा देश म्हणजे बेटांचा समूह आहे. इथे तब्बल १७ हजार बेटं आहेत. पॅसिफिक आणि हिंदी महासागराच्या मध्यभागी हा देश वसला आहे. निसर्गसंपन्न असा हा देश आहे. इथल्या काही मोठ्या बेटांवर डोंगर आणि ज्वालामुखीही आहेत. इंडोनेशिया हा उष्ण कटिबंधातला देश आहे. या देशात बरीच जंगलं आहेत. तसंच विविध प्रजातींचे प्राणी-पक्षी आहेत. १९४५ पर्यंत इंडोनेशियावर नेदरलँडचं राज्य होतं. तेव्हापासून या देशात युद्ध आणि बरेच संघर्षही झाले. पण, आज या देशात लोकशाही आहे. नागरिकांचं राहणीमान उंचावण्यासाठी इथलं सरकार प्रयत्न करत आहे. इंडोनेशियाला फिरायला जाणाऱ्या पर्यटकांची संख्याही खूप मोठी आहे. या देशात मुस्लीमांची संख्या सर्वात जास्त आहे. त्यामुळे जगातला सर्वाधिक मुस्लीम लोकसंख्या असलेला देश म्हणून तो ओळखला जातो. जावा आणि सुमात्रा ही दोन मोठी बेटं या देशात आहेत. पण सर्वात जास्त लोकसंख्या जावा बेटावर राहते.






सुमात्रा हे इथलं सर्वात मोठं बेट आहे. इंडोनेशियाची लोकसंख्या २५२ दशलक्ष इतकी आहे. बहासा इंडोनेशिया ही इथली प्रमुख भाषा आहे. इंडोनेशिया हे नाव इंडॉस आणि नेसॉस या दोन ग्रीक शब्दांनी बनलं आहे. भारताच्या जवळ असलेली बेटं असा या दोन शब्दांचा अर्थ आहे. जकार्ता ही इंडोनेशियाची राजधानी. हा देश तेल, वायू, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कापड आणि रबर यांची निर्यात करतो.

# भाज्यांचे सालही बरेच गुणकारी

**ॲप वर्ल्ड**

मित्रांनो, सुट्टीचा या दिवसांमध्ये तुम्ही आईला स्वयंपाकात मदत करत असाल. बरेचदा मोठी माणसे तुम्हाला फळे वा भाज्या धुवून, सोलून देण्यास सांगतात. पण खरे तर या सालींमध्ये अत्यंत पौष्टिक तत्त्व असतात. तुम्हाला हे अवश्य माहिती असायला हवे. उदाहरणार्थ, भाजी शिजवायची असेल किंवा बटाटे उकडून खाताना बरेचदा साल काढले जाते. पण याच सालीमध्ये लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, जीवनसत्त्वे आणि मॅग्नेशियम या सारख्या पोषक तत्त्वांचा समावेश असतो. ही तत्त्वे चयापचय निरोगी ठेवण्यास मदत करतात. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे. यातील ॲंटीबॅक्टेरियल घटक त्वचेसाठीही फायदेशीर असतात. म्हणूनच शक्यतो बटाटे सालासह खा. अशाच पद्धतीने कारल्याच्या सालीमध्येही इन्सुलिनसारखे संयुग पॉलीपेप्टाइड-पी भरपूर असते. तसेच भरपूर प्रमाणात ॲंटीऑक्सिडंट असतात, जे शरीरातील अत्यंत विषारी कण काढून टाकतात. या व्यतिरिक्त कारल्याच्या सालीमध्ये असणारे व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन ए केसांची चमक वाढवते आणि त्वचा निरोगी ठेवते. म्हणूनच कारले सालीसह खावे. भोपळ्याच्या सालीमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन बी २, व्हिटॅमिन ई, आयर्न यांसारख्या पोषक तत्त्वांचा समावेश असतो. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. तसेच भोपळ्याच्या सालीमध्ये असणारे फायबर पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. म्हणून भोपळ्याचे पदार्थही त्याच्या सालीसह तयार केलेले असावे.

# घामाची चिकचिक सतावते?

**हेल्थ वेल्थ**

उन्हाळ्यात घामाच्या दुर्गंधीने हैराण व्हायला होते ना? सध्या तुम्हीही याच गोष्टीने त्रस्त असाल. पण मुलांनो, वाढत्या उन्हाप्रमाणेच आहारातील काही घटकही अंगाच्या दुर्गंधीस कारणीभूत असतात, हे तुम्हाला माहिती आहे का? चला तर मग, आज याविषयी अधिक माहिती घेऊ या.

मित्रांनो; कढीपत्ता, जिरे आणि मेथीसारखे मसाले दातांमध्ये अडकले आणि वेळेत दात घासले नाहीत तर आपल्या श्वासाला दुर्गंधी येते. या मसाल्यांमध्ये अस्थिर संयुगे असतात, जे रक्तात सहजपणे शोषले जातात आणि याच कारणामुळे शरीराला एक वेगळाच वास येतो. म्हणून यामुळे येणारी दुर्गंधी टाळण्यासाठी प्रत्येक जेवणानंतर खळखळून चूळ भरा वा दात घासा.

लसूण आणि कांदा खाल्ल्याने आपल्या श्वासाला दुर्गंधी येऊ शकते. खेरीज यामुळे उच्च रक्तदाब आणि शरीरातील उष्णताही वाढू शकते. मग शरीराची ही उष्णता सामान्य करण्यासाठी जास्त घाम येतो. जास्त घाम म्हणजे जास्त प्रोटीन रेणू. जीवाणू ते तोडतात तेव्हा दुर्गंधी येते. म्हणूनच लसूण आणि कांद्याच्या सेवनानंतर चूळ भरायला विसरु नका. मुलांनो, लाल मांस खाल्ल्यानेही तोंडाला तसेच शरीराला वाईट वास येतो. लाल मांस खाल्ले तर घामामध्ये प्रोटीनचे रेणू जास्त असतात. ही प्रथिने त्वचेच्या बॅक्टेरियामध्ये मिसळतात तेव्हा शरीरातून तीव्र वास येतो.


अंगाला उग्र दर्प येण्यास हिरव्या भाज्याही कारणीभूत ठरतात. उदाहरणार्थ; ब्रोकोली, कोबी, स्प्राउट्स आणि फ्लॉवर या सारख्या स्वादिष्ट भाज्यांमध्येही भरपूर सल्फ्यूरिक ॲसिड असते. ते घामावाटे बाहेर पडल्यावर दुर्गंधी येते.



# शिका संवाद साधायला

**कोण होणार?**


संवाद साधण्याच्या क्षेत्रात काम करताना स्पष्ट उच्चार आणि प्रभावी आवाजाची गरज असते. अनेकजण बीपीओ, कॉल सेंटरमध्ये काम करत असतात. काहींना सूत्रसंचालनाच्या क्षेत्रात जायचं असतं. मनोरंजनाच्या क्षेत्रातही आवाजाला, उच्चारांना महत्त्व असतं. त्यामुळे तुम्हीही आवाज आणि उच्चार प्रशिक्षक म्हणून करीअर करू शकता. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी तुमच्याकडे संवादकौशल्य असणं गरजेचं आहे. विविध भाषांचं ज्ञान उपयुक्त ठरू शकतं.



इंग्रजी, हिंदीसह स्थानिक भाषेवर प्रभूत्व असायला हवं. तुमची शब्दसंपत्ती चांगली हवी. व्याकरणाची जाण हवी तसंच उच्चारही योग्य असायला हवेत. स्पष्ट आणि प्रभावीपणे बोलता यायला हवं. इतरांना प्रशिक्षण देण्याचं कौशल्य तुमच्याकडे असायला हवं. तसंच नवं शिकण्याची आवडही असायला हवी. आत्मविश्वास असायला हवा. या क्षेत्रात कोणीही करीअर करू शकतं. तुम्ही चांगला संवाद साधू शकत असाल तर या क्षेत्राचा विचार करू शकता. लहान वयात उच्चारासंबंधीचे अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही पुढे जाऊ शकता. स्वत:च्या प्रयत्नांनीही तुम्ही घडू शकता. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी तुमच्याकडे बोलण्यासोबतच ऐकण्याचं कौशल्यही असायला हवं. यानंतर तुम्ही मोठ्या कंपन्यांमध्ये प्रशिक्षक म्हणून काम करू शकता. स्वत:चे प्रशिक्षण वर्गही सुरू करू शकता. मनोरंजनाच्या क्षेत्रात जाण्याची इच्छा असणाऱ्यांनाही मार्गदर्शन करू शकता.

# मस्त योगा पँट

योगासनं शिकायची तर क्लास लावायला हवा. योगा प्रशिक्षक आपल्याला वेगवेगळी आसनं शिकवतात. पण आता तुम्हाला क्लासला जायची गरज भासणार नाही. याचं कारण म्हणजे स्मार्ट योगा पँट. ही पँट घालून योगा केला तर तुम्हाला ॲपवर आसनांची माहिती मिळू शकेल. योगसनं करण्याची पद्धतही तुम्ही इथे शिकू शकता. 'नडी एक्स' असं या स्मार्ट योगा पँटचं नाव आहे. वेअरेबल एक्स या स्टार्ट अप कंपनीने ती तयार केली आहे. या पँटमुळे तुम्ही घरातल्या घरात योगासनं करू शकता. या पँटमध्ये पाच एक्सलॅरोमीटर सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. तसंच काही व्हायब्रेशन पॅनल्सही आहेत. या योगा पँटच्या डाव्या गुडघ्याच्या मागच्या बाजूला बॅटरी बसवण्यात आली आहे. ही बॅटरी तुम्ही काढूही शकता. ही बॅटरी पूर्ण चार्ज केल्यानंतर ९० मिनिटांपर्यंत चालू शकते. बॅटरी काढून ही पँट धुताही येते. ही योगा पँट वापरण्यासाठी कंपनीने आयओएस ॲपही तयार केलं आहे. या ॲपमधून तुम्ही वेगवेगळ्या प्रकारच्या आसनांची माहिती घेऊ शकता. व्हिडिओही बघू शकता. लवकरच अँड्रॉइड ॲपही तयार केलं जाईल. योगासनं करताना कोणत्या स्नायूंवर लक्ष केंद्रित करायला हवं हे सुद्धा ॲपमुळे कळू शकेल. नियमित योगा करणाऱ्यांना ही पँट उपयुक्त ठरू शकेल.






# असा खुलवा निबंध


**स्टडी टिप्स**

भाषेवर प्रभुत्व मिळवायचे असेल तर निबंध चांगल्या प्रकारे लिहिता यायला हवा. इंग्रजी, मराठी, हिंदीच्या पेपरमध्ये तुम्हाला निबंध लिहायला असतो. तुम्हाला तुमची लेखनशैली विकसित करता यायला हवी. त्यासाठी तुम्हाला या टिप्स उपयोगी पडतील.



* तुम्ही इतरांचे निबंध वाचा. त्यात तुमचे मित्रमैत्रिणीही येतात. त्यांचे पेपर घेऊन त्यांनी नेमकं काय लिहिलं आहे हे समजून घ्या. आपण कुठे कमी पडतो याचा विचार करा. वेगवेगळ्या विषयांवरचे निबंध तुम्ही वाचायला हवेत. इतरांच्या निबंधांमधलं तुम्हाला काय आवडलं, कोणते मुद्दे योग्य वाटले, कोणत्या गोष्टी खटकल्या याचंही विश्लेषण करा.
* तुमची शब्दसंपत्ती वाढवा. यामुळे तुम्ही स्वत:ला नीट व्यक्त करू शकाल. तुमच्याकडे योग्य शब्दच नसतील तर तुम्हाला व्यक्त होता येणार नाही. शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी भरपूर वाचायला हवं.
* नवे शब्द लिहून काढा. त्यांचे अर्थ शोधा. नव्या म्हणी, वाकप्रचार शिकून घ्या. त्यांचे अर्थ समजून घ्या. यामुळे तुम्ही तुमचा निबंध अधिक चांगल्या प्रकारे खुलवू शकता.
* एकच एक शब्द सतत वापरून कंटाळा आला असेल तर त्याच अर्थाचे इतर शब्द शोधण्याचा प्रयत्न करा. कोणते नवे शब्द वापरता येतील याचा अभ्यास करा.
* परदेशी भाषा शिकत असाल तर तुम्ही शब्दसंग्रह तयार करता. मग मातृभाषेतल्या शब्दांचाही असाच संग्रह तयार करा. एक नोटपॅड किंवा डायरी विकत घ्या. नवे शब्द लिहून ठेवा. समान, विरूद्ध अर्थाचे शब्दही लिहून काढा. आता सतत उजळणी करत राहा.

**ठिपके जुळवा**



# पहिल्यांदा स्मार्टफोनमध्ये काय आलं?

**स्मार्ट टेक**

बाजारात दररोज नवा स्मार्टफोन दाखल होत असतो. या वर्षीही अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेले स्मार्टफोन आले आहेत. यापैकी काही स्मार्टफोन्समध्ये विशिष्ट तंत्रज्ञान पहिल्यांदा सादर करण्यात आलं. अशाच काही स्मार्टफोन्सवर नजर टाकू या.



* 'हुवावे पी २० प्रो' जगातला पहिला ट्रिपल लेन्सवाला स्मार्टफोन ठरला. फोनच्या मागच्या कॅमेऱ्यात ४० एमपीचा आरजीबी सेन्सर, २० एमपीचा मोनोक्रोम सेन्सर आणि ८ एमपीची टेलीफोटो लेन्स बसवण्यात आली आहे.
* 'व्हिवो एक्स २० प्लस युडी'मध्ये इन स्क्रीन फिंगरप्रिंट फीचर देण्यात आलं आहे. फोन अनलॉक करण्यासाठी फिंगरप्रिंट स्कॅन करायचं असेल तर आपल्याला स्क्रीनवर बोट ठेवावं लागेल. त्यानंतर फोन बोटाच्या ठशाची ओळख पटवून घेईल आणि मग फोन अनलॉक होईल. हे तंत्रज्ञान एक्स २० प्लस युडीमध्ये पहिल्यांदाच वापरण्यात आलं आहे.
* 'नोकिया ८ सिरोक्को' हा क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ८३५ हा प्रोसेसर बसवण्यात आलेला जगातला पहिलाच फोन आहे. हा फोन खूपच वेगवान आहे.



* 'आसुस आरओजी' हा फोन गेम खेळण्याची आवड असणाऱ्यांसाठी तयार करण्यात आला आहे. या स्मार्टफोनमध्ये ९० हर्टझ रिफ्रेश रेटवाला एमोलेड स्क्रीन देण्यात आला आहे.
* पॉप अप कॅमेरा फिचर असलेला 'व्हिवो नेक्स' हा जगातला पहिला स्मार्टफोन आहे.

## ओळखा पाहू...

**जिज्ञासा**

१) फटाक्यांमध्ये हिरव्या रंगाची ज्योत कशामुळे दिसते?
२) वाहनचालकाच्या सुरक्षेसाठी असलेल्या एअरबॅगमध्ये काय असतं?
३) विविध प्रकारच्या वेल्डिंगमध्ये कोणत्या वायूंचा वापर होतो?
४) स्वत:चं अन्न तयार करू न शकणारं रोपटं कोणतं?
५) मदुमलाई राष्ट्रीय उद्यान कोणत्या राज्यात आहे?
६) पर्ल हार्बर हे बेट कोणत्या महासागरात आहे?
७) कम्युनिस्ट पार्टीची स्थापना करणारा रशियन क्रांतीकारी कोण?
८) सर्वप्रथम टी बॅग्ज बनवणारी कंपनी कोणती?
९) कोणत्या शहराचा एक भाग आशिया खंडात आणि दुसरा भाग युरोपमध्ये आहे?
१०) १५०० च्या शतकात चीनमध्ये कोणत्या घराण्याचं राज्य होतं?

उत्तर : १) बॅरियम २)सोडियम अझाइड ३) ऑक्सिजन आणि ॲसिटिलिन ४) मशरूम ५) तामिळनाडू ६) पॅसिफिक महासागर ७) लेनिन ८) टेटली ९) इस्तंबूल १०) मिंग

**दोस्त हे मस्त**

### सुमात्रीयन टायगर

सुमात्रा बेटांवर आढळणाऱ्या वाघांना सुमात्रीयन टायगर असं म्हटलं जातं. हे वाघ इतर प्रजातींपेक्षा आकाराने लहान असतात. ही प्रजाती दुर्मीळ म्हणून गणली जाते. आज अवघे ५० सुमात्री वाघ उरले आहेत. कमी होत जाणारी जंगलं आणि शिकार यामुळे या वाघांची संख्या कमी झाली. त्यांना वाचवण्याची गरज आहे.



**खादाडी**

### एग सँडविच

अंडं आरोग्यदायी असतं. नुसतं अंडं खायचा कंटाळा आला असेल तर अंडं आणि ब्रेड खाता येईल. यासाठी अंडं उकडून घ्या. ब्रेड घ्या. त्याला बटर लावा. चटणीही लावता येईल. आता अंड्यांचे तुकडे करून त्यात घाला वरून मीठ आणि मिरपूड घाला आणि मस्त एग सँडविच खा.



**महत्वाचं काही...**

### अतिशुद्ध पाणी प्यायल्याने...

शुद्ध पाणी पिण्यावर आपल्या प्रत्येकाचा भर असतो. यासाठी घराघरांमध्ये वॉटर प्युरिफायर बसवले जातात. अशुद्ध पाण्यामुळे बरेच रोग होत असले तरी अतिशुद्ध पाणी पिण्याचेही धोके आहेत. पाणी अतिशुद्ध केल्याने त्यातले गुणधर्म कमी होतात तसंच शरीराची रोगप्रतिकारक शक्तीही कमकुवत होते. शुद्ध पाण्याचा हट्ट धरल्याने आपण रोगांना लवकर बळी पडू शकतो. त्यामुळे शुद्ध पाणी पिऊन आपलं आरोग्य धोक्यात येत नाही ना, याकडेही लक्ष द्यायला हवं.



**योगा टाईम**

### ऊषास मुद्रा

तुम्हाला खूप कंटाळा येतो का? सकाळी लवकर उठणं अगदी नको वाटतं का? मग तुम्ही ऊषास ही मुद्रा करू शकता. या मुद्रेमुळे शरीरात नवा उत्साह संचारतो. ही मुद्रा सकाळी करायची असते. यासाठी दोन्ही हातांची बोटं एकमेकांमध्ये गुंतवा. हाताचे पंजे वरच्या दिशेने ठेवा. डाव्या हाताचा अंगठा उजव्या हाताच्या अंगठ्यावर ठेऊन हलकेच दाबा. आता हात डोक्याखाली ठेवा. दीर्घ श्वास घ्या. श्वास सोडा. श्वास घेताना तोंड आणि डोळे उघडा. असं साधारण पाच ते सहा वेळा करा.







# मग कोणताच वाली नसेल?

**या लेखाच्या माध्यमातून समाजाला आणि समाजातील विशेषतः त्या तरुण मुलींना हेच सांगायचे आहे की त्या तरुण मुलींनी सुधारावं. प्रेम करावं. नाही करावं असं मी तरी म्हणत नाही. परंतु प्रेम अशांवरच करावं की जो विवाह करणारा असेल आणि विवाहापुर्वी कोणाशी शरीरसंबंध करु नये म्हणजे झालं. कारण विवाहापुर्वी शरीरसंबंध ठेवल्यानं जी पश्चातापाची वेळ येते ना. त्या वेळेचा कोणीच वाली नसतो. खुद्द आपले मायबापही वाली नसतात. समाज तर दूरच. हीच वास्तविकता आहे आणि हीच वास्तविकता चिरंतन व सत्य आहे, यात शंका नाही. हा समाज गुन्हेगाराला शिक्षा देणार नाही. कारण तसा कायदाही नाही. परंतु तिच्या तशा वागण्यानं गुन्हेगाराला स्वतःची लाज वाटेल पावलोपावली. त्यानंतर तो विवाह करण्याचा प्रस्ताव जेव्हा ठेवेल, तेव्हा तिनं एखाद्या भिकाऱ्याशी विवाह करावा त्याच्यासमोरच.**

अंकुश शिंगाडे



भारतीय चित्रपटसृष्टी दरवर्षी वेगवेगळे चित्रपट आणत असते व ते बॉक्स ऑफिसवर सपशेल आपटत असतात. अपवाद काही जे चांगले चित्रपट असतात. ते चित्रपटाच्या बाजारात चालत असतात.चित्रपटाच्या बाजारात चालणारे चित्रपट तसेच बरेच आहेत की ज्यांचे नाव घेता येतील; परंतु यादी अजिबात संपणार नाही. परंतु जे खरंच चांगले होते, त्यांचं नाव बोटावरच मोजण्यासारखं आहे.

चित्रपटाचे गाणे व एक उत्कृष्ट कथानक म्हणून नावाजलेल्या चित्रपटात राम तेरी गंगा मैली हा चित्रपट वाखाणण्याजोगाच होता. त्याचं कथानक व गाणी उत्कृष्ट होती. त्यानंतर आलेला हम आपके है कोन बॉक्स ऑफिसवर चांगलाच पराक्रम करुन गेला. माहेरची साडीही गोल्डन जुबली होता. त्यातच लज्जा हादेखील उत्कृष्टच. सारे चित्रपट नावाजलेले. जे प्रेक्षकांनी पाहिले. ते चित्रपट आणि त्यांचं कथानक त्याचबरोबर त्यांची गाणी आजही ओठावर तरळतात. परंतु काही असेही चित्रपट आले की ते चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आपटले. त्यांचं कथानक जरी चांगलं असलं तरी ते चित्रपट आवडले नाहीत लोकांना. त्याचं कारण काय होतं ते माहीत नाही. कारण काहीही असू शकतं. प्रत्येकांची पसंती तशी वेगवेगळी असते. असाच एक चित्रपट बॉक्स ऑफिसवर आला व तो जास्त दिवस चालण्यापूर्वीच चित्रपटगृहातून बाजूला सारला गेला. तसं पाहिल्यास ज्या चांगल्या गोष्टी असतात. त्या विशेषतः लोकांना आवडत नाहीत. तसंच या चित्रपटाच्या बाबतीतही घडलं. तसं पाहिल्यास राम तेरी गंगा मैली हा चित्रपट आजही काही लोकांच्या ओठात आहे. कारण त्याचे गाणे फारच सुंदर होते. तसा तो चित्रपट माझ्या आवडीचाच आहे. परंतु, त्यापरसही सुंदर चित्रपट मला आवडला. जो चित्रपट चित्रपटगृहात जरी चालला नसेल, परंतु जो माझ्या हृदयातील गर्भगृहात बरेच दिवस चालला. आजही चालत आहे, नव्हे तर गोल्डन जुबली ठरला. तो चित्रपट आहे, क्या कहना.

क्या कहना चित्रपट... तो सन २००० ला चित्रपटगृहात लागला व त्यानं त्या सालात बॉक्स ऑफिसवर सर्वात जास्त कमाई केली. उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार त्या चित्रपटातील नायिका प्रिती जिंटाला मिळाला व उत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार त्याच चित्रपटातील कलाकार चंद्रचूड सिंगला. तसंच उत्कृष्ट कथानकाचा पुरस्कार हनी इराणीला मिळाला.

विशेष म्हणजे कोणताही चित्रपट चित्रपटाच्या बाजारात उठतो. तो अभिनेत्याचा अभिनय, संगीत आणि चित्रपटाचं कथानक. या चित्रपटातील गाणे तेवढे खास नव्हते. अभिनय तेवढं खास नव्हतं. परंतु कथानक जोरदार होतं. त्यामुळंच गाणी तेवढी गाजली नाहीत. परंतु चित्रपटाच्या कथेनं चित्रपट फार कमाई करुन गेला. मात्र तो लोकांच्या तेवढ्या प्रमाणात स्मरणात राहिला नाही. परंतु त्यावरच आधारीत सरकारनं पुढं त्या स्वरुपाचा कायदा तयार जरी केला नसेल, तरी करायला सरकार भाग पडावं. असं मला वाटते. या चित्रपटातील कलाकार असलेल्या प्रिती जिंटाने जी भूमिका अदा केली, ती खरंच वाखाणण्याजोगीच आहे. तसं तिनं साकारलेल्या महाविद्यालयीन मुलीचं धाडस, हेही वाखाणण्याजोगंच आहे आणि तिला साथ देणारा तिचा मित्र चंद्रचूड सिंग, याचीही भूमिका वाखाणण्याजोगीच आहे. म्हणूनच हा चित्रपट माझ्या हृदयात स्थान करुन गेला. हे त्या चित्रपटाचं यशच म्हणावं लागेल.

या चित्रपटाचं कथानक असं. गुलशन (अनुपम खेर) आणि रोहिणी बक्षी (फरीदा जलाल) यांची मुलगी प्रिया बक्षी (प्रीती झिंटा) ही तरुण, आनंदी-नशीबवान मुलगी आहे. प्रियाचे आई-वडील, भाऊ आणि जिवलग मित्र अजय (चंद्रचूड सिंग) जो तिच्यावर प्रेम करतो. हाच अजय तिला सांगत नसतो की ती तिच्यावर प्रेम करीत आहे.तसा तो तिला एक सत्यवादी मित्र सांगते व ती दुसऱ्याच एका मित्राबरोबर प्रेम करीत असते. ज्याचं नाव असतं राहुल (सैफ अलीखान). प्रिया ही महाविद्यालय शिकत असते. त्या महाविद्यालयात ती प्रवेश करते. तेव्हा तिच्या नजरेस पडतो तो राहुल. तो अशा गोष्टी करतो तिच्यासोबत की, ती त्याचेसोबत प्रेम करायला लागते. परंतु, तिचा भाऊ व अजय तिला त्याच्यापासून दूर राहण्याची विनवणी करतात. कारण त्यांना माहीत असतं की तो चांगला नाही. तेव्हा ती त्यांचं ऐकत नाही. तसं पाहिल्यास सर्वच मुली ह्या कोणाच्या प्रेमात पडताच आपल्या भावा बहिणीचं वा आपल्या आईवडिलाचं ऐकत नाहीत. तसंच घडलं तिच्याही जीवनात. ती त्या दोघांचंही न ऐकता आपल्याच तालात वागते व त्याचेचसोबत प्रेम करीत राहते. त्यातच शरीरसंबंधही बनवते. त्यानंतर ती गरोदर राहते. ते माहीत होताच प्रिया त्याला म्हणते की त्यानं आपल्या आईवडिलांना भेटावे व विवाहाची बोलणी करावी. परंतु तो तिची गंमत घेतो व तिला तद्नंतर सोडून देतो.

प्रिया मनातून नाखूष असते. तिला आता महाविद्यालयात जायला लाज वाटते. कोणत्याच कामात लक्ष लागत नाही व काहीच करावंसं वाटत नाही. मायबाप सांगतात की, तिनं गर्भपात करुन टाकावा. तशी तिही विचार करते गर्भपाताचाच.

ती तयार होते गर्भपात करण्यासाठी. तोच गर्भातून आवाज येतो, 'आईऽऽ'. तो आवाज.... तोच आवाज तिच्या जीवनाला कलाटणी देणारा ठरतो. त्यानंतर ती ठरवते की आता आपण गर्भपात करायचा नाही आणि आपण लाजायचंही नाही. आपण याच गर्भाला घेऊन महाविद्यालयात जायचं. तशी ती आपल्या आईवडिलांना सांगते. तसे ते निराश होतात. तिला काहीबाही बोलतात. परंतु, ती घाबरत नाही. तसे तिचे मायबाप आता राहुलची भेट घेऊन त्याला त्यानं तिच्याशी विवाह करावा, असं बोलतात. त्यावर तो म्हणतो की तो तिच्याशी विवाह करेल. परंतु, दोन दिवसानं तो तिला घटस्फोट देईल. त्यानंतरही प्रिया गर्भपात करीत नाही हे पाहून तिचे ते मायबाप, समाजाला आम्ही काय उत्तर देणार, असा विचार करुन तिला घरातून हुसकावून लावतात. परंतु, पुढे जेव्हा त्यांना तिच्या गर्भावस्थेची आठवण येते. तेव्हा ते तिला परत घरी आणतात.

वरील सर्व प्रकार करीत असताना समाज त्या राहुलला दोष देत नाही, ज्यानं व्याभिचार केला. कारण तो श्रीमंत असतो. त्यातच ती त्याही परिस्थितीत समाजाशी लढत असताना समाज तिच्या परिवाराला व तिला दूर लोटवतो. शेजारीपाजारीही तिला व तिच्या परिवाराला दूर लोटवतात. शिवाय, ती जेव्हा महाविद्यालयात जाते, तेव्हा महाविद्यालयातील तिचं मित्रमंडळही तिला दूर लोटवतात. महाविद्यालयातील कर्मचारी त्यांच्या महाविद्यालयाची बदनामी होईल, असं तिला म्हणतात. महाविद्यालयातील मुली तिला वाईट म्हणतात आणि वाळीत टाकतात. परंतु, याही परिस्थितीत तिच्याच महाविद्यालयात शिकणारा मुलगा आणि तिचा मित्र अजय तिच्याशी सहानुभूतीपूर्वक वागणूक देतो. तिच्या सर्व इच्छा पूर्ण करतो. तिची दखल घेतो. तिच्या इच्छा जोपासतो नव्हे तर, सर्व प्रकारच्या त्रासात तिची सावली बनून तिला मदत करतो. तसे काही दिवस असेच घृणेत जातात. काही दिवसानं तीच घृणा करणारी मंडळी तिच्या बाजूनं उभी ठाकतात. त्यानंतर तिला समाज स्विकारतो.

समाज प्रियाला जसा स्वीकारतो. तसाच राहुलही तिच्यामागं घिरट्या घालतो. तो तिच्यासमोर विवाहाचा प्रस्ताव ठेवतो. परंतु ती आता त्याला स्पष्ट नकार देते आणि मनात ठरवते की अजयशी विवाह करावा. ज्यानं ती गरोदर असतानाही तिला जपलं. तिची काळजी घेतली व तिला सांभाळलं.

या चित्रपटाबाबतीतील महत्त्वपूर्ण गोष्ट ही की, आज समाजात असे बरेच लोकं आहेत की जे समाजातील कोणत्याही भोळ्याभाबड्या मुलींना फसवतात. त्यानंतर तिला विवाहाची मोठमोठी आश्वासन देऊन तिच्याशी शरीरसंबंध जुळवतात. आपल्या हौस-मौज पूर्ण करतात. त्यानंतर जेव्हा अशा मुली गरोदर राहतात आणि विवाह कर म्हणतात, तेव्हा मात्र आपले मायबाप काय म्हणेल? आपला समाज काय म्हणेल? याचा विचार करुन ते अशा मुलींना सोडून जातात. त्यानंतर अशा मुली आपल्या गर्भातील मुलांचा गर्भपात करतात.

काहींचा गर्भ पडत नाही. अशा मुली गर्भाला अंधाऱ्या खोलीत स्वतःला बंदीस्त करुन बाळाला जन्म देतात. त्यानंतर त्या बाळाची विल्हेवाट कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर लावतात. ज्याला कुत्रे खात असतात. असे बऱ्याच वेळा आढळून आले आहे. शिवाय, काही मुली अशा काळात चक्क आत्महत्याही करतात, हे आढळून आले आहे. हा चित्रपट असला तरी ही वास्तविकताच आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून हनी इराणीनं सन २००० मध्ये क्या कहना चित्रपटातून दाखवलं की समाज असाही असतो. त्यामुळं कोणत्याही मुलीनं घाबरुन जाऊ नये. त्याचा प्रतिकार करावा. समाजात तिनं न लाजता खुलेपणाने बागडावं. जेणेकरुन समाजाला गुन्हेगाराची जाणीव होईल. ■■

# रंगदेवतेच्या रंगमंदिरातला नंदादिप 'अशोक सराफ'

श्रीराम शेटये



गेली पन्नास वर्षे मराठी रंगभूमीच्या आणि चित्रपटविश्वाच्या रंगमंदिरात अखंड तेवणारा नंदादीप म्हणजे अशोक सराफ. मराठी रंगभूमीच्या आणि चित्रनगरीच्या अवकाशात अनेक वादळे आली. अनेक झंझावात आले. परंतु, या मंदिराला आपल्या मंगलमय निष्कलंक पवित्र प्रकाशाने उजळत ठेवणारा अभिनेता म्हणजे अशोक सराफ.

चंदनाचे झाड असते त्याचा सुगंध स्वयंभू असतो. आंतर्बाह्य सुगंध रोमारोमात भिनलेला असतो. त्याला अत्तराचा छिडकाव करायची गरज नसते. त्याचा नैसर्गिक सुगंध दरवळत असतो. चंदनाच्या सहवासाने वातावरण दरवळते, मंगलमय होते. अशोक सराफ यांचा अभिनय असाच नैसर्गिक अभिजात आहे. त्यांना ओढून ताणून अभिनय करावा लागत नाही, तो आपसुकच येतो. गेली पन्नास वर्षे रंगभूमीची आणि चित्रनगरीची सेवा करत असताना निष्कलंक चारित्र्य असलेले अभिनेते म्हणजे अशोक सराफ. मराठी रंगभूमी व चित्रनगरीच्या अनेक कलावंतांना त्यांच्या पडत्या काळात कोणताही गाजावाजा न करता लाखा-लाखाची मदत करणारे देवदूत म्हणजे अशोक सराफ.

निर्माते, दिग्दर्शक, सहकलाकार यांच्याशी अंत्यत विनम्रतापूर्वक वागणारे, सहिष्णूता, आदर आणि सहकलाकारांना सहकार्याचा हात देणारे अशोक सराफ हे रंगभूमीच्या आणि चित्रनगरीच्या सर्व कलाकारांसाठी आदर्श आहेतच. परंतु, कुठल्याही क्षेत्रात ज्यांना मोठे व्हायचं आहे त्यांच्यासाठी दीपस्तंभ आहेत. मराठी रंगभूमी हीच भारतीय चित्रपटांची जननी आहे. दादासाहेब फाळके या मराठी माणसाने आपले सगळे आयुष्य पणाला लाऊन चित्रपटसृष्टीला जन्माला घातले. चित्रपट आले आणि मराठी रंगभूमी मात्र डबघाईला आली. अशा पडत्या काळात मराठी रंगभूमी वाचविण्यासाठी ज्यांनी आटोकाट प्रयत्न केले त्यातलं एक नाव म्हणजे नाटककार नटवर्य गोपीनाथ सावकार. ते मास्टर विनायक यांचे असिस्टंटसुद्धा होते. त्यांची स्वतःची कलामंदिर नावाची नाटक कंपनी होती. भावबंधन, शाकुंतल, सुवर्णतुला, ययाती देवयानी ही त्यांची प्रसिद्ध नाटके. हे गोपीनाथ सावकार हे अशोक सराफ यांचे मामा. ते गिरगावात चिखलवाडीत अशोक सराफ यांच्याच घरी राहायला होते. गोपीनाथ सावकार यांना भेटायला राजा गोसावी, दामुअण्णा मालवणकर, वसंत शिंदे, नानासाहेब फाटक. यांसारखे त्या काळातील दिग्गज नट येत असत. वयाच्या सातव्या वर्षी पहिली एकांकिका केली. त्यात अशोक सराफ यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. अशोक सराफ यांच्या चिखलवाडीच्या बाजूच्याच वाडीत सुनील गावसकर रहायचे. दोघेही एकत्र क्रिकेट खेळायचे. लहानपणी 'गुरूदक्षिणा' या नाटकात अशोक सराफ बलराम आणि सुनिल गावसकर कृष्ण अशा भूमिका दोघांनी केल्या होत्या. सुनील गावसकर यांनी अशोक सराफ यांच्यासोबतचा याच नाटकातील एक पोटो आपल्या 'सनीडेज' या आत्मचरित्रात आठवणीसहित छापला आहे.

त्या काळात बँकांची नाटके होत आंतरबँकिंग नाटक स्पर्धा होत असे. याच कोट्यातून नट म्हणून अशोक सराफ यांना बँकेत नोकरी मिळाली. या स्पर्धांचे परीक्षक म्हणून चित्रपट निर्माते दिग्दर्शक गजानन जागिरदार आले होते. त्यांनी अशोक सराफ यांना 'दोन्ही घरचा पाहुणा' या चित्रपटात प्रथम संधी दिली.

पण अशोक सराफ यांनी हा चित्रपट केल्यानंतर नवीन काम करणं थांबवलं. प्रथम त्यांनी कॅमेऱ्यासमोर कसा अभिनय करायचा याचा चार वर्षे अभ्यास केला. नंतर दादा कोंडके यांचा 'पांडू हवालदार' हा चित्रपट त्यांना मिळाला. त्यांची भूमिका लोकांना आवडली. नंतर आलेल्या 'राम राम गंगाराम'मधील म्हमद्या घाटी ही भूमिका त्यांनी अप्रतिम केली.

अशोक सराफ यांच्या आयुष्यात आलेली त्यांची धर्मपत्नी निवेदिता जोशी हीदेखील मराठी चित्रपटांतील एक प्रतिथयश अभिनेत्री आहे. दोघांच्या लग्नाची गोष्टही अत्यंत विलक्षण आहे. निवेदिता चित्रपटातील बालकलाकार होती. तिच्या घरातील वातावरण चित्रपटाला पोषक होते. वडील गजानन जोशी १९७० च्या जमान्यातले अत्यंत देखणे अभिनेते होते. आई विमल जोशी नाट्य कलाकार होती. संगीतकार श्रीनिवास खळे यांचे जोशी कुटुंबियांशी खूप स्नेहपूर्ण संबंध होते. छोट्या तीन वर्षांच्या निवेदिताला आई खळे काकांच्या स्टुडिओत ठेवून कधी कधी नाटकाच्या प्रयोगासाठी जात असे. खळे काका गाणी रेकॉर्डिंग करत असत आणि छोटी निवेदिता खेळत असे. गजानन जोशी आणि अशोक सराफ साधारण समवयस्क होते. दोघांनीही नाटकात एकत्रित काम केलेले होते. एकदा तर 'ही माझी मुलगी निवेदिता म्हणून' छोट्या निवेदाची अशोक सराफ यांच्याबरोबर ओळखही करून दिली होती. अर्थात, त्या छोट्या मुलीशी पुढे मोठी झाल्यावर आपण लग्न करणार आहोत याची कल्पना अशोक सराफ यांना कधी स्वप्नातही नव्हती. पण, दैवगती वेगळीच असते. दोघांचे लग्न झाले. त्यानंतर दोघेही अभिनय करीत राहिले. अशोक सराफ यांनी धुमधडाका, बनवाबनवी, गंमत जंमत, नवरी मिळे नवऱ्याला, असे अनेक सुपरहीट चित्रपट गाजवले. डबघाईला आलेल्या मराठी चित्रपटसृष्टीला एका उंचीवर नेऊन ठेवले.आरपार प्रामाणिकपणा, कलेशी प्रचंड निष्ठा या गुणांनी मराठी रंगभूमी आणि चित्रपटविश्वाला नंदादीपासारखे आपल्या अभिनयच्या प्रकाशाने उजळत ठेवले आहे. 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देऊन महाराष्ट्र शासनातर्फे त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आलेला आहे. ■■

# रहस्यमय 'प्रीत अधुरी' चित्रपटाचा अल्ट्रा झकासवर वर्ल्ड डिजिटल प्रीमियर!

राम कोंडीलकर

प्रेमकथा, इच्छा पूर्ण करणारी जादुची वस्तू, दमदार कथानकाला असलेली कसदार अभिनयाची जोड, अनोखा विषय आणि त्याची साजेशी मांडणी अशा अनेक गोष्टींचा सुंदर मिलाफ असणाऱ्या 'प्रीत अधुरी' चित्रपटाचा अल्ट्रा झकास या मराठी ओटीटीवर २६ एप्रिल २०२४ रोजी वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे.चित्रपटाचं कथानक एका अशा वस्तूच्या भोवती फिरतं, जी व्यक्तीच्या तीन इच्छा पूर्ण करू शकते! नायकच्या घरी ती वस्तू येते तेव्हा त्याच्यासाठी आकाश ठेंगणं होतं. आता नायक आणि नायिका या वस्तूचा वापर करून नेमकं काय मागतात आणि त्यातून पुढे कशा घडामोडी घडत जातात, हे चित्रपटात कळणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन जिल्हा परिषद शाळेत पेशाने शिक्षिका असणाऱ्या प्रियांका यांनी केलं असून, प्रवीण यशवंत आणि प्रीया दुबे या नव्या जोडीच्या भन्नाट केमिस्ट्रीसोबत संजय खापरे, मिलिंद दास्ताने, अरुण नलावडे, शमा निनावे आणि कमलेश सावंत या दिग्गज कलाकारांनी चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका बजावल्या आहेत. 'गूढ आणि रहस्यमय कथा नेहमीच प्रेक्षकांना खास आकर्षित करतात, म्हणूनच अशा विषयांवर 'प्रीत अधुरी'सारखे खास चित्रपट प्रदर्शित करून रसिकांचं झकास मनोरंजन करण्याचा आमचा कायम सकारात्मक हेतू असतो. अल्ट्रा झकासचे वेगवेगळ्या विषयांवर आधारित चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असल्याचा आम्हाला खूप आनंद आहे.' असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.ई.ओ. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले. ■■



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)